POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२०० ● मुंबई, गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## जयंतीला श्रद्धांजलीचं ट्विट

## राहुल गांधींवर राज्यभरातून टीकेची झोड



■मुंबई। प्रतिनिधी :

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या दिवशी श्रद्धांजली अर्पण करणे हे भाषिकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या अयोग्य आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या ट्विटर पोस्टमध्ये ''शिवजयंती दिनी श्रद्धांजली'' असा उल्लेख केल्यामुळे हा मुद्दा चर्चेत आला आहे. यावर प्रतिक्रिया देताना छत्रपती संभाजीराजे यांनी स्पष्ट सवाल केला आहे.'जयंतीच्या दिवशी कोणी श्रद्धांजली अर्पण करते का?' जयंती हा साजरा करण्याचा, प्रेरणा घेण्याचा दिवस असतो. त्यामुळे अशा वेळी 'श्रद्धांजली' हा शब्दप्रयोग चुकीचा असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. या प्रकारावर इतिहासप्रेमी आणि शिवभक्तांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. शिवजयंती ही महाराजांच्या विचारांची पुनस्मृती करण्याची संधी असते, श्रद्धांजली नव्हे. त्यामुळे सार्वजनिक नेत्यांनी भाषेची आणि परंपरांची योग्य जाण ठेवून विचारपूर्वक शब्दप्रयोग करावा, असेही छत्रपती संभाजीराजे यांनी म्हटले आहे.

**राहुल गांधींनी ही माफी मागितली पाहिजे : निलेश राणे**

राहुल गांधी यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. ते चायनामध्ये असल्यासारखे वक्तव्य करतात. ते परदेशात गेले तरी भारताची बदनामी करतात. राहुल गांधी हे भारतीय नाहीत, केवळ त्यांचा पासपोर्ट आहे. ज्यांना आपली संस्कृती माहिती नाही, त्यांना जयंती आणि श्रद्धांजलीचा अर्थ कळत नाही. नेता म्हणण्याची एकही क्वॉलिटी राहुल गांधी यांच्याकडे नाही. त्यांनी आज महाराजांचा अपमान केलाय, त्यामुळे काँग्रेस पक्षांना माफी मागितली पाहिजे. राहुल गांधींनी ही माफी मागितली पाहिजे. अशी मागणी आमदार निलेश राणे यांनी केली आहे.

**गांधी परिवाराने केवळ नेहरू, गांधी आणि काँग्रेस विषयी बोलावं : प्रताप सरनाईक**

राहुल गांधींना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काही माहिती नसावं. गांधी परिवाराने केवळ नेहरू, गांधी आणि काँग्रेस विषयी बोलावं. देशातील आराध्य दैवत याबाबत त्यांनी काही बोलू नये, त्यांना काही माहिती नाही. राज्यासाठीच नव्हे तर देशासाठी छत्रपती शिवरायांनी काय केले हे राहुल गांधींना माहिती नाही. त्यामुळे देशाच्या विरोधी पक्षाचे नेतृत्व करणारा व्यक्ती शिवरायांना अशी श्रद्धांजली वाहत असेल तर मी त्याचा धिक्कार करतो, मी त्यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध करतो. अशी प्रतिक्रिया परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

## राज्यात पुन्हा एकदा डान्सबारची छमछम सुरू होणार?

## डान्सबार पुन्हा सुरू केले तर मैदानात उतरू, रोहित आर आर पाटलांनी दिला इशारा

■मुंबई। प्रतिनिधी :

राज्यात पुन्हा एकदा डान्सबारची छमछम सुरू होणार का अशी चर्चा सुरू झाली आहे. याचं कारण म्हणजे डान्सबार बंदीबाबतच्या राज्याच्या कायद्यात सुधारणा करून तो अधिक कडक केला जाणार आहे. यासंदभार्तील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत येणार होता. मात्र आयत्या वेळी हा प्रस्ताव मांडण्यात आला नसल्याची माहिती सुत्रांकडून मिळत आहे. यावरून विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला आहे.




**नव्या तरतुदी काय?**

- डान्सबारमध्ये नोटांची उधळण करता येणार नाही
- डिस्को आणि ऑर्केस्ट्रा संदर्भात राज्य सरकारच्या परवानगी संदर्भात ही बदल करणार
- डान्सबार संदर्भात कायदा करताना समितीमध्ये डान्सबारचा प्रतिनिधी असावा
- डान्सबार फ्लोअरवर चारपेक्षा अधिक बारबाला नको
- बारबाला आणि ग्राहकांमध्ये किमान 2 मीटरचे अंतर असावं
- ग्राहकांना डान्स फ्लोअरवर जाता येणार नाही
- डान्सबारमध्ये धूम्रपानास मनाई
- बारबालांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावं
- बारमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत

हे बदल कायद्याने केले जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

राज्यात पुन्हा एकदा डान्सबारची छमछम सुरू होण्याची शक्यता आहे. डान्सबार बंदीबाबतच्या राज्याच्या कायद्यात सुधारणा करून तो अधिक कडक केला जाणार आहे. यासंदभार्तील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत येणार होता. मात्र, आयत्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मसुद्यात सुधारणा करून पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्याच्या सूचना संबंधित अधिका-यांना केल्याचा माहिती सूत्रांनी दिली आहे. सुप्रीम कोटार्नं डान्स बारसंदर्भात अलीकडेच काही निर्देश दिले आहेत. त्या आड डान्स बार पुन्हा सुरू करण्याच्या हालचाली सुरु आहेत. त्याला रोखण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरु आहेत.

मात्र कॅबिनेटचा निर्णय लीक झाल्यामुळेच हा प्रस्ताव मांडता आला नाही असं म्हणत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. दरम्यान यावरून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित आर आर पाटील आक्रमक झाले आहेत. डान्सबार पुन्हा सुरू केले तर मैदानात उतरू, असा इशारा रोहित आर आर पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे.

राज्य सरकारने २०१६ साली डान्सबारसंदर्भात एक कायदा केला होता. डान्स बारसंदर्भात नवा कायदा आणण्याच्या तयारीत आहे. महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ ऑब्सेन डान्स इन हॉटेल्स, रेस्तराँ अँड बार रूम्स अँड प्रोटेक्शन ऑफ डिग्निटी ऑफ वुमन अ‍ॅक्ट २०१६ हा नवा कायदा केला होता. या कायद्यात आता काही नव्या तरतुदी करण्यात येणार आहेत.

**२००५ साली तत्कालीन गृहमंत्री दिवंगत आर आर पाटील यांनी डान्सबारवर बंदी घातली होती..**

- २००५ साली तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटलांनी डान्सबारवर बंदी घातली
- वाढती व्यसनाधीनता, वाढती गुन्हेगारी, महिलांचं शोषणामुळे डान्सबार बंदीचा निर्णय
- बंदी घालण्यात आली तेव्हा सरकारी आकड्यांनुसार ८०० नोंदणीकृत डान्सबार होते
- मुंबई परिसरात डान्सबारमध्ये काम करणाऱ्या ७५ हजार बारबाला होत्या
- डान्सबार मालकांनी याविरोधात न्यायालयात धाव घेतली
- सर्वोच्च न्यायालयाने ही बंदी उठवत काही नियम लागू करण्याचे आदेश दिले
- राज्य सरकारने २०१६ साली पुन्हा राज्याचा सुधारित कायदा केला

नियमांमध्ये सुधारणा करून आता राज्यात पुन्हा डान्सबार सुरू होण्याची शक्यता आहे. मात्र अनेक संसारांची रोखरांगोळी करणारे, तरुणांना व्यसनाधीन करणारे डान्सबार पुन्हा सुरू होऊ नयेत अशीच अपेक्षा सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहे.

**भुजबळांना अखेर दादांचा दिलगिरीचा फोने**

आतापर्यंत प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यामार्फतच छगन भुजबळ यांच्याशी संपर्क साधला जात होता. अनेक वेळा छगन भुजबळ यांनी अजित पवार यांच्यावर बोलण्यास टाळाटाळ केली होती. शिर्डीतल्या राज्यव्यापी शिबीरातही काही तासांसाठी हजेरी लावत छगन भुजबळ यांनी आपण नाराज असल्याचे पुन्हा संकेत दिले. पण आता चार दिवसांपूर्वी अजित पवार यांचा दिलगिरी व्यक्त करत फोन आल्याच छगन भुजबळ यांनी सांगितलं आणि अजित पवार आणि छगन भुजबळ यांच्या पॅचअपची चर्चा सुरु झाली. अजित पवार यांच्या या दिलगीरीच्या फोननंतर आता छगन भुजबळ यांची नाराजी दूर होते का, आणि छगन भुजबळ राष्ट्रवादीत सक्रीय होतात का याची उत्सुकता राष्ट्रवादीच्या राजकीय वतुर्ळात असेल.

## राष्ट्रवादीच्या कार्यक्रमात भुजबळ, नाराजी झाली दूर?

■मुंबई। प्रतिनिधी :

'जहाँ नहीं चैना, वहाँ नहीं रहना'... मंत्रिपदापासून दूर ठेवल्यानंतर राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी नाराज होत हा डायलॉग मारला होता. मात्र भुजबळांची ही नाराजी दूर झाल्याची चर्चा सुरू झालीय. छगन भुजबळांनी राष्ट्रवादीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याने या चर्चा सुरू झालीय.

मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर राष्ट्रवादीवर नाराज असलेल्या छगन भुजबळांनी असं शेरोशायरीच्या माध्यमातून आपली नाराजी व्यक्त केली होती. मात्र आता भुजबळांची राष्ट्रवादीवरील नाराजी दूर झाल्याची चर्चा सुरू झालीय. छगन भुजबळांनी अनेक दिवसानंतर पक्षाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली. मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्वराज सप्ताह हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा शुभारंभ छगन भुजबळांच्या हस्ते झाला.



ज्या शिडीर्तील राष्ट्रवादीच्या अधिवेशनाला उपस्थित राहिल्याचं छगन भुजबळ सांगताहेत. त्या अधिवेशनाला भुजबळ नावापुरतेच केवळ २ तास उपस्थित होते. मात्र मुंबईतील पक्षाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याने भुजबळांची नाराजी दूर झाल्याचं बोललं जातंय.

मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर आरपारची भाषा करणारे भुजबळ आता मात्र पक्षाच्या नेत्यांसोबत उपस्थित राहुन गप्पागोष्टी करताना दिसताहेत. त्यामुळे जहाँ नहि चैना वहाँ नहि रहना वरून भुजबळांचा डायलॉग बदलून आता चैना यहाँ रहना यहाँ अशा झाल्याचं पाहायला मिळतंय.

**पुरोगामी भुजबळांची वाटचाल धार्मिकतेकडे?**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भय्याची जोशी यांनी छगन भुजबळ यांना चक्क रामभक्ताची उपमा दिलीये. छगन भुजबळ म्हणजे ओबीसी नेते, छगन भुजबळ म्हणजे शाहू-फुले-आंबेडकरवादी नेते अशी छगन भुजबळ यांची प्रतिमा आहे. पण आता भय्यूजी जोशींनी त्यांना रामभक्त अशी नवी उपाधी बहाल केलीय. नाशिक जिल्ह्यातील नांदूर माध्यमेश्वरमधील राम मंदिराच्या जोर्णोद्धाराच्या कार्यक्रामत छगन भुजबळ आणि भय्याजी जोशी एकाच मंचावर आले होते. त्यावेळी जोशी यांनी हा उल्लेख केलाय. यावेळी छगन भुजबळ आणि भय्याजी जोशी यांनी श्रीरामाची एकत्रित आरतीही केली. या सोहळ्यासाठी जी बॅनरबाजीही केली त्या बॅनर्सच्या भगव्या रंगाचीही चर्चा होती.

## मंत्रिमंडळ बैठकीचा अजेंडा फुटला, देवेंद्र फडणवीस रागावले

## कुणीही असो, कारवाई करण्याचा इशारा

■मुंबई। प्रतिनिधी :



मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्र्यांवर रागावले अशी माहिती आ-हे. मंत्रिमंडळ बैठकीच्या आधीच माध्यमांमध्ये अजेंडा छापून येत असल्याने फडणवीसांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असं स्पष्ट सांगितलं. थोडक्यात काय तर मंत्रिमंडळ बैठकीचा अजेंडा लिक करणाऱ्यांची खैर नाही असा गंभीर इशाराच मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. या सगळ्याला कारणही तसंच होतं. मंगळवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये डान्सबार संदर्भात चर्चा होणार होती. मात्र बैठकीच्या आधीच एबीपी माझानं ही बातमी दाखवली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतप्त झाले. विरोधकांनीही यावरुन आपले हात धुवून घेतले. महायुती सरकारमधील नेत्यांनी यावर सावध प्रतिक्रिया दिली आहे. मंत्री भरत गोगावले म्हणाले की, मंत्रिमंडळाचा अजेंडा कोणी फोडला याची चौकशी सुरू आहे. मंत्री आणि त्याच्या पीएसनीही हा अजेंडा गुप्त ठेवायचा असतो. ज्यांनी हा अजेंडा फोडला आहे तो कोणीही असो, त्याच्यावर कारवाई होईल. पूर्वी निर्णय लीक होत होते. या पुढच्या काळात तशा प्रकारची गुप्तता पाळली जावी. कारण गुप्तता पाळण्याची आपण शपथ घेतो. ती शपथ तंतोतंत खरी ठरवण्याची फडणवीस यांची इच्छा आहे आणि त्या धर्तीवर काम सुरू आहे असं मंत्री निलेश राणे यांनी म्हटलंय. मोदी सरकार असो की फडणवीस सरकार, गुप्तता हाच यांचा यूएसपी राहिला आहे. केंद्र असो की राज्य गेली १० वर्षे सरकारकडून सर्व गोष्टींमध्ये अतिशय गुप्तता पाळली जात आहे. अशा पद्धतीने बातम्या लीक व्हायची सवय नसल्याने फडणवीसांचा चांगलाच संताप झाल्याचं दिसून आलं.

## ‘तो दगड उचल आणि ठार मारून टाक त्या पोलिसाला’

■पुणे। प्रतिनिधी :

पुण्यात पोलिस कर्मचारीच सुरक्षित नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कोम्बिंग ऑपरेशन करून घरी निघालेल्या एका पोलिसाला सेनापती बापट रस्त्यावरील रत्ना हॉस्पिटलच्या परिसरात चौघा दारुड्यानी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. त्यांचा मोबाईल हिसकावला. संबंधित पोलिसाने याबाबत चतु:श्रृंगी पोलिसाकडे तक्रार नोंदवली आहे. गुन्हा दाखल करून मारहाण करणाऱ्या दारुड्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कानावर हा प्रकार जाताच, चतु:श्रृंगी पोलिसांनी तीन दिवसानंतर गुन्हा दाखल केला. चंद्रकांत जाधव यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी रुपेश मांजरेकर, अनिकेत घोडके आणि अभिजीत डोंगरे या तिघांना अटक केली. त्यांच्या अन्य एका साथीदाराच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चंद्रकांत जाधव यांना मारहाण करण्यात आल्याचा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. फियार्दी जाधव हे सहकारनगर पोलिस ठाण्यात तैनात आहेत. ते रामोशीवाडी एस.बी. रोड परिसरात वास्तव्यास आहेत. गुरुवारी मध्यरात्री आपल्या पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कोम्बिंग ऑपरेशन संपवून घरी परत निघाले होते. रत्ना हॉस्पिटलच्या परिसरात आले असता, चौघेजण त्यांना रस्त्यावर एका रिक्षात मध्यप्राशन करताना दिसले. ते चौघे गोंधळ घालत होते. जाधव यांनी त्यांना हटकले आणि गोंधळ घालत असल्याचा जाब विचारला. त्याचा त्यांना राग आला. त्यांनी जाधव यांना धमकावलं. रिक्षात डांबून बेदम मारहाण केली.



**‘ठार मारून टाक’**

तो दगड उचल आणि ठार मारून टाक त्या पोलिसाला असे म्हणत आरोपींनी जाधव यांच्या डोक्यात दगडाने मारहाण केली. आपली सुटका करून घेतल्यानंतर जाधव यांनी मोबाईलमध्ये आरोपींचे फोटो काढले. तो मोबाईल त्यांनी हिसकावून घेतला. सर्वात गंभीर प्रकार म्हणजे जाधव हे पोलिस असल्याची माहिती असताना देखील निर्ढावलेल्या गुन्हेगारांप्रमाणे चौघांनी त्यांना मारहाण केली. हा प्रकार घडल्यानंतर जाधव यांनी ओळखीच्या चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यातील एका अधिकार्याला फोन करून आपल्याला मारहाण झाल्याचे सांगितले.

**‘माझी तक्रार तर दाखल करून घ्या साहेब’**

काही वेळानंतर चतु:श्रृंगी पोलिस घटनास्थळी पोहचले तोपर्यंत चौघे तेथून फरार झाले होते. जाधव यांनी चतु:श्रृंगी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल करून घेण्यास सांगितले. त्यावेळी तेथील अधिकार्यांनी आता नको उद्या पाहू असे म्हणत वेळ मारून नेली, जाधव यांनी माझी तक्रार तर दाखल करून घ्या साहेब असे म्हटल्यावर त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आले.

## कुठं वाढणार उकाडा तर कुठं वादळी पाऊस

■मुंबई। प्रतिनिधी :

देशभरात सध्या ऋतूबदलांचं सत्र सुरू असून, येत्या दिवसांत तापमानात लक्षणीय चढ- उतार होण्याची चिन्हं आहेत. केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार देशाच्या उत्तरेकडे पुढील काही दिवस वादशी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून, कमाल तापमान २८.८ अंशांदरम्यान राहील. बुधवारीसुद्धा मंगळवारप्रमाणंच तापमानात वाढ कायम राहणार आहे. देशाच्या उत्तर पश्चिमेकडे पुढील २४ तासांमध्ये किमान तापमानात बदल होणार असून, इथून देशात वाहणारे वारेही यामुळं प्रभावित होताना दिसणार आहेत. देशाच्या हवामानात हे बदल होत असतानाच महाराष्ट्राला आतापासूनच उन्हाचा तडाखा बसताना दिसत आहे. राज्यात ब्रह्मपुरी इथं पारा ३८ अंशांवर पोहोचल्यामुळं होरपळ वाढली आहे. दरम्यान, पुढील २४ तासांमध्ये राज्याच्या कमाल तापमानात आणखी वाढ होण्याचा इशाराही जारी करण्यात आला आहे.

## न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक प्रकरणी लाय डिटेक्टर चाचणीची मागणी

■मुंबई। प्रतिनिधी :

लाखो मुंबईकरांप्रमाणे हितेश मेहता पाच वर्षे आपल्या कार्यालयातून घरी लोकलने बॅग घेऊन प्रवास करत होता. मात्र, फरक एवढाच होता की, तो त्या बॅगेतून लाखो रुपयांची ने-आण करायचा. गेल्या पाच वर्षात न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या महाव्यवस्थापक आणि अका-उंट्स विभाग प्रमुख हितेश मेहताने बँकेच्या प्रभादेवी व गोरेगाव येथील शाखेतील तिजोरीतून थोडी-थोडी करून १२२ कोटी रुपयांची हेराफेरी केली. हितेश मेहता चौकशीत खोटी माहिती देत असल्याचा संशय आ-हे. त्यामुळे पोलीस मेहताची लायडिटेक्टर चाचणी करण्याची न्यायालयात मागणी करण्याबाबत विचार करत आहेत. या प्रकरणी लेखापरीक्षण विभागातील एका अधिकाऱ्याचाही आर्थिक गुन्हे शाखेने जबाब नोंदवला आहे.

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतील १२२ कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणातील ७० कोटी रुपये चारकोप येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात गुंतवण्यात आले आहेत तर उर्वरीत ४० कोटी रुपये सोलार पॅनल व्यावसायिकाला देण्यात आली असून महाव्यवस्थापक हितेश मेहतान याने स्वतःही काही रक्कम वापरल्याचे चौकशीत सांगितले आहे. गेल्या पाच वर्षांपासून आरोपीने प्रभादेवी व गोरेगाव येथील तिजोरीतील थोडी-थोडी रक्कम काढून त्याच्या परिचीत व्यक्तींना व्याज-ावर देत होता. दोन हजार रुपये चलनात असताना बहुतांश रक्कम काढण्यात आली.

हितेशने करोना काळात ठेवीदारांचे पैसे काढण्यास सुरूवात केली. व्यवसायात प्रचंड नुकसान झाल्यामुळे व्यावसायिकांना पैशांची नितांत गरज असल्याचे पाहून हितेशने बँकेतील ठेवीदारांचे पैसे व्याजाने देण्यास सुरूवात केल्याची प्राथमिक माहिती तपासात उघड झाली आहे. या गैरव्यवहारात हितेशसह आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धर्मेश पौन यालाही अटक केली आहे. धर्मेश हा बांधकाम व्यावसायिक असून त्याचा झोपडपट्टी प्रकल्प चारकोप येथे सुरू आहे. हितेशने धर्मेशला व्यवसायासाठी ७० कोटी रुपये दिल्याचे कबूल केले आहे.

काही वर्षांपूर्वी हितेशने धर्मेशकडून एक सदनिका खरेदी केली होती. त्यावेळी दोघांमध्ये मैत्री झाली होती. कालांतराने धर्मेशकडून घेतलेला सदनिका विकण्यात आली. तसेच सौर-ऊर्जा यंत्रणा पुरवणारे व्यवसायिक उन्ननाथन अरूणाचलम ऊर्फ अरूणभाई यालाही ४० कोटी रुपये दिल्याचे चौकशीत हितेशने सांगितले आहे.

## पुण्यात तरुणीचा जीबीएसमुळे मृत्यू, पाणीपुरी खाल्ल्यानंतर त्रास सुरु

■पुणे। प्रतिनिधी :

जीबीएस या गुढ आजारामुळे राज्यात घबराट पसरली असताना आता या आजाराचे बळी वाढत चालले आहेत. या आजाराने पुण्यात शिकत असलेल्या एका विद्यार्थीनीचा बळी गेला आहे. या विद्यार्थीनी पुण्यात सिंहगड परिसरात शिकत होती. तिला पाणीपुरी खाल्ल्यानंतर त्रास होऊ लागला होता. त्यानंतर तिची तब्येत खालावली तिच्यावर बारामतीत रुग्णालयात उपचार सुरु होते. काल तिचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

तीन आठवड्यापूर्वी पुण्यातील सिंहगड परिसरात शिकत असलेल्या बारामतीतील तरुणीला पाणीपुरी खाल्ल्यानंतर त्रास सुरू झाला होता. ही तरुणी बारामतीत पोहोचल्यानंतर तिला जुलाब आणि अशक्तपणा जाणवू लागला होता. बारामतीतील रुग्णालयात उपचारासाठी गेल्यानंतर डॉक्टरांना तपासणी केली. त्यानंतर लगेच डॉक्टरांनी तिला पुण्याला उपचारासाठी घेऊन जाण्याचा सल्ला तिच्या नातेवाईकांना सल्ला दिला. गेली तीन आठवडे तिची सुरु असलेली झुंज अखेर संपली आहे. पुण्यातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असतानाही तिचा काल अचानक मृत्यू झाला. किरण राजेंद्र देशमुख असे या दुर्दैवी युवतीचे नाव आहे.

**अमरावतीत जीबीएसचा शिरकाव...**

सध्या राज्यात सर्वत्र धुमाकूळ घालत असलेला जीबीएस या आजाराचा रुग्ण अमरावती जिल्ह्यात देखील आढळून आला आहे. ६५ वर्षीय या रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयसीयूमध्ये दाखल केले आहे. अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील अष्टगाव येथील ही व्यक्ती १२ दिवसापूर्वी पुण्याहून प्रवास करून आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. मात्र या पहिल्या जीबीएस रुग्णामुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

**जळगावात तीन वर्षीय बालकाला ‘जीबीएस’**

जळगावात तीन वर्षीय बालकाला ‘जीबीएस’ आजार झाल्याचे उघडकीस आले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बालरोग विभागातील अतिदक्षता वॉर्डात या बालकावर उपचार सुरू आहेत.या बालकाला गेल्याकाही दिवसांपासून पायदुखीचा त्रास झाल्याने रक्ताची तपासणी केली असता त्याला जीबीएस आजार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. ‘जीबीएस’ या आजाराचे जिल्ह्यात आतापर्यंत तीन रुग्ण आढळून आले असून एका महिला रुग्णाला नुकताच डिस्चार्ज दिला आहे. तर एका तरुणासह बालकावर उपचार सुरू आहेत.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# लालपरीच्या आजारावर उपाय काय?

ऑगस्ट २०२४. तब्बल ९ वर्षांनंतर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटी महामंडळ नफ्यात असल्याची चर्चा सुरू झाली. ही चर्चा सुरू होण्याचे कारण म्हणजे त्यावेळी एसटी महामंडळाने केलेले ट्वीट. एसटीला तब्बल १६ कोटी ८६ लाखांचा फायदा झाल्याचे ते ट्वीट होते. मग असे अचानक काय घडले की एसटी अचानक तोट्यात गेली. नोव्हेंबरमध्ये राज्यात विधानसभा निवडणूक झाली. तत्पूर्वी एसटी नफ्यात आली होती मग आता अचानक एसटी महामंडळाची आर्थिक प्रकृती कशी बिघडली, हा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न आहे. वास्तविक एसटी म्हणजेच लालपरी ही ग्रामीण महाराष्ट्राच्या वाहतुकीची नस आहे. कानाकोपऱ्यात, खेडोपाड्यात रस्ता तिथे एसटी अशी महामंडळाची सेवा आहे. कोरोनाकाळात महामंडळाची आर्थिक बाजू विस्कळीत झाली होती. पण तो दीड-दोन वर्षांचा काळच तसा होता. असे असले तरी ऑगस्टमध्ये नफ्यात असलेली एसटी अचानक तोट्यात कशी जाते, कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी (पीएफ) चार महिने भरला जात नाही. ही बाब खूप गंभीर आहे. चिंतेची बाब म्हणजे कर्मचाऱ्यांच्या वेतनातून ही रक्कम कापूनही पीएफमध्ये भरली गेली नाही. याचाच अर्थ एसटी महामंडळाची तब्येत नरम-गरम आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून एसटी महामंडळाभोवती जोरदार राजकारण खेळले जात आहे. सर्वांच्या लक्षात असेल तर २०२१ मध्ये एसटी कर्मचाऱ्यांनी मोठे आंदोलन केले होते. भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत या आंदोलनाच्या अग्रस्थानी होते. एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करावे आणि एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे म्हणजे सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळावे, अशी मागणी त्यांनी लावून धरली होती. हे आंदोलन चिघळले होते. या मागणीमुळे आणि कर्मर्चायांच्या संपामुळे एसटीचा कारभार जवळपास ठप्प झाला होता. पुढे जून २०२२ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार गेले आणि महायुतीचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर एसटी महामंडळाच्या विलीनीकरणाची मागणी कुठे विरली, कुणालाही कळले नाही. मात्र, एसटी कर्मचारी जिथल्या तिथेच आहे. आतातर कर्मर्चायांच्या पीएफचा चार महिन्यांपासून भरणा न झाल्याने हजारो कर्मचाऱ्यांची आर्थिक चिंता वाढली आहे. भविष्य निर्वाह निधी काही ठरावीक गरजांसाठीच काढला जातो. अशी गरज असलेल्यांचे अर्ज प्रलंबित आहेत. त्यांनी आर्थिक तरतूद कशी करायची हा प्रश्न आहे. महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत दिल्याने एसटी महामंडळ नफ्यात आल्याचे वक्तव्य काही नेत्यांनी वारंवार जाहीरपणे केले होते. ती योजना आजही सुरू आहे. मग अचानक नफ्यातील एसटी महामंडळ आर्थिक अडचणीत कसे आले, याचे उत्तर मिळत नाही. राज्यात लालपरीतून रोज सरासरी ५४ ते ५५ लाख लोक प्रवास करतात. मार्च २०२३ पासूनच महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्यात आली. तत्पूर्वी ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना ऑगस्ट २०२२ पासून मोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली. महिलांना सवलत दिल्याने प्रवासी वाढले आणि उत्पन्न वाढल्याचा दावा गेल्यावर्षी ऑगस्टपर्यंत केला जात होता. तरीही एसटी तोट्यात कशी गेली? यंदा २५ जानेवारीपासून तिकीट दरात १४ टक्के वाढ करण्याचा कठोर निर्णय महामंडळाला घ्यावा लागला. याचाच सरळ अर्थ असा होतो की, एसटी महामंडळ तोट्यात आहे. एसटी महामंडळाला रोज तीन ते साडेतीन कोटींचा तोटा सहन करावा लागत असल्याची माहिती आहे. हा आर्थिक आजार असल्यामुळे यावर निर्णयदेखील कठोरपणे घ्यावा लागणार आहे. मात्र, मतांसाठी केलेल्या लोकप्रिय घोषणांमुळे एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या आजारी पडत असेल तर महामंडळाच्या आयएएस दर्जाच्या अध्यक्षांनी याचे योग्य निदान करण्याची गरज आहे. कर्मचाऱ्यांची आर्थिक कुचंबणा करण्याचा अधिकार कुणालाही नाही. असे असताना एसटीचा कारभार सुधारणेही गरजेचे आहे. राज्यातील एसटी डेपो पाहिले तर त्यांना स्वच्छतेशी वावडे असल्याचे जाणवते. परिवहन मंत्री झाल्यानंतर प्रताप सरनाईक यांनी काही एसटी डेपोंना अचानक भेटी देऊन प्रवाशांना सुखद धक्का दिला. त्यांनी एसटी बसमधूनही प्रवास केला. त्यांनी सर्व डेपो तसेच शौचालय स्वच्छ ठेवण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यांच्या सूचनेचे खरेच पालन केले जात आहे का, याचा त्यांनीच आढावा घेण्याची गरज आहे. तसेच वेळेवर बस सुटत नसल्याने प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. अनेकदा एसटी बसची अवस्था खूप बिकट असल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. शिवाय हात दाखवूनही एसटी न थांबणे, असेही प्रकार निदर्शनास येत असतात. एसटी महामंडळाने शेकडो बस भाडेतत्वावर घेतलेल्या आहेत. त्याऐवजी आता एसटी महामंडळ ५ हजार नवीन बस विकत घेण्याची तयारी करत आहे. त्यासाठी पंचवार्षिक नियोजन करणार आहे. मात्र, महामंडळाच्या तिजोरीत खडखडाट असताना हे खरोखरच शक्य होणार आहे का, त्यांची पीएफची रक्कम भरली जाणार आहे का, हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

# भरतीचे आमिष, बेरोजगारीचा डोंगर

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दीड लाख नोकऱ्या उपलब्ध करण्याची घोषणा केली असली, तरी वास्तव याच्या उलट असल्याचे आकडेवारी सांगते. राज्यात वर्षभरात २४ लाखांहून अधिक बेरोजगारांनी नोकरीसाठी नोंदणी केली आहे; मात्र भरतीचा वेग अत्यंत मंद आहे. बेरोजगारीचा आलेख सतत वाढत आहे. रोजगार निर्मितीसाठी राज्य आणि केंद्र सरकारने ठोस धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे, अन्यथा बेरोजगार तरुणांमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वीच दीड लाख नोकऱ्या उपलब्ध करणार असल्याचे जाहीर केले; मात्र राज्यात गेल्या वर्षभरात २४ लाखांहून अधिक बेरोजगार तरुणांनी नोकरीसाठी नोंदणी केल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यात राज्यात दरवर्षी सेवानिवृत्तीमुळे ३ टक्के पदे रिक्त होतात, तर गेल्या ८ ते १० वर्षांत नोकर भरतीचे प्रमाण हे नाहीच्या बरोबर आहे. त्यामुळे नोकर भरतीचे आमिष दाखवायचे प्रत्यक्षात मात्र बेरोजगार तरुणांना नोकरीची प्रतीक्षा आहे. त्यामुळे राज्यात बेरोजगारीचा डोंगर उभा राहिला आहे.

राज्यात दिवसागणिक बेरोजगारीचा आलेख वाढतच आहे. वर्षभरात २४ लाख ५१ लाख इच्छुकांनी रोजगार पोर्टलवर नोकरी मिळावी, यासाठी नोंदणी केली. बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ठोस धोरण असणे गरजेचे आहे. राज्यात सरकार कोणाचेही असो बेरोजगारी मोडीत काढण्यासाठी रोजगार धोरण निश्चित करणे गरजेचे आहे; मात्र सत्तेत कुठलेही सरकार असो रोजगार निर्मितीसाठी धोरण निश्चितीकडे कानाडोळा असतो. निवडणुका जवळ आल्या की, घोषणांचा पाऊस पाडायचा. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ, बेरोजगारांना महिना १० हजार रुपये, वषार्ला तीन सिलिंडर मोफत अशा विविध योजनांमुळे घरबसल्या पैसे मिळणार, यामुळे नोकरी करायची तरी कशाला, अशी भावना तरुण-तरुणींमध्ये निर्माण होणे स्वाभाविक आहे. रोजगार निर्मितीसाठी केंद्र सरकार असो, वा राज्य सरकार धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे, तर आणि तरच बेरोजगारीवर मात करणे शक्य होईल.





रोजगारनिर्मिती करण्यात कमी पडणारे धोरण आणि सरकारचे निर्णय यामुळे बेरोजगारी दिवसेंदिवस वाढतच आहे. कृषी, सेवा, उद्योग आणि पायाभूत सोयी या दोनच क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते; मात्र गेल्या काही वर्षांत या विभागात नोकर भरतीबाबत नकारात्मक स्थिती दिसत आहे. कृषी क्षेत्रात हीच स्थिती असून, उत्पादन वाढत असले, तरी रोजगार निर्मिती घसरत आहे. सद्यःस्थितीत राज्य शासनातील विविध संवर्गात अडीच लाखांहून अधिक पदे रिक्त आहेत. एकूण मंजूर पदांच्या (७.१७ लाख) तब्बल ३५ टक्के पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने न भरता लोकसेवा आयोग, जिल्हा निवड मंडळे आदी पद्धतीने भरल्यास राज्यातील बेरोजगार तरुणांना शासकीय सेवेची संधी मिळेल. त्यामुळे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने ठोस निर्णय घेणे अपेक्षित आहे.

केंद्र सरकारच्या निदेर्शानुसार, फॉक्सकोन हा प्रकल्प गुजरातला गेला. त्यामुळे राज्यात बेरोजगारी समस्या वाढली आहे, तर राज्यात नुकताच सेमीकंडक्टरचा प्रकल्प राज्य सरकारने गुजरातला जाऊ दिला. वस्तू उत्पादन व रोजगार निर्मिती करणारे हे कारखाने मह त्वाचे आहेत. त्यामुळे राज्यातील बेरोजगारीवर मात करण्यासाठी राज्य सरकारने पुरेसे वेतन देणारा कायमस्वरूपी रोजगार आणणे काळजी गरज बनली आहे. अन्यथा राज्यात बेरोजगारी वाढत जाईल आणि बेरोजगार तरुणांचा उद्रेक होईल आणि त्याला राज्य सरकार जबाबदार असेल यात दुमत नाही.


दावोसमध्ये नुकतीच वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची परिषद पार पडली. या परिषदेत राज्यात १५.७० लाख कोटींची गुंतवणूक आणि १५.९५ लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यात कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक आणि लाखो रोजगा निर्मिती होणार असेल, तर सोन्याहून पिवळे; मात्र प्रत्यक्षात रोजगार निर्मिती होईल की, फक्त बाता हे पुढील काही महिन्यांत स्पष्ट होईलच. मात्र राज्यातील बेरोजगारी कमी करण्यासाठी राज्य सरकारने ठोस व योग्य निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**बेरोजगारीचा आलेख!**

- २०१८ ते २०२४ या कालावधीत भारतातील बेरोजगारीचा दर सरासरी ८.१८ टक्के होता.
- २०२० च्या एप्रिलमध्ये बेरोजगारीचा दर २३.५० टक्क्यांवर पोहोचला होता.
- २०२२ च्या सप्टेंबरमध्ये बेरोजगारीचा दर ६.४० टक्क्यांवर पोहोचला होता.
- मार्च २०२४ मध्ये, आयएलओ अहवालानुसार, भारतातील एकूण बेरोजगारांपैकी सुमारे ८३ टक्के तरुण बेरोजगार आहेत.

# प्रदूषित भूजलाची खोली

गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) आजारामुळे पाण्याच्या, विशेषतः भूजलाच्या गुणवत्तेचा मुद्दा चर्चेत आला आहे. भूजलस्त्रोतांत पृष्ठभागावरील प्रदूषित पाणी मिसळल्याने त्याची गुणवत्ता बिघडली आहे. भूमिगत सांडपाणी वाहिन्यांची गळतीही यास कारणीभूत आहे.



भूपृष्ठाखाली भूजल अत्यंत संथगतीने पुढे सरकते. त्यामुळे त्यातील प्रदूषके सहज इतरत्र पसरत नाहीत. शिवाय भूजलाचे तापमान भूपृष्ठावरील पाण्यापेक्षा कमी असल्यामुळे आणि मुळातच या पाण्यात जीवाणू कमी असल्यामुळे प्रदूषकांच्या विघटनाची प्रक्रिया होत नाही. त्यामुळे भूजल एकदा प्रदूषित झाले की, हजारो वर्षे त्याच अवस्थेत राहते. लेड, अर्सेनिक, फ्लोराइड ही द्रव्ये त्यात कायमच आढळतात. नेमक्या किती परिसरात भूजल प्रदूषित झाले आहे, याचा अंदाज करता येत नाही. अमेरिकेसारखे देश प्रदूषित भूजल क्षेत्रांचे मापन करून प्रदूषणाचे प्रमाणही शोधण्यासाठी मोठा खर्च करतात. पणहे सर्वच देशांना परवडत नाही. शहरांच्या पाणीपुरवठ्यातील भूजलामध्ये ४५ टक्के सेंद्रिय रासायनिक प्रदूषके असतात. शहरांत साठलेले पाणी झिरपून भूजल प्रदूषण होते. डिझेल, पेट्रोल, उद्योगांतील विषारी द्रावकांची भूमिगत साठवण यामुळे हे प्रमाण वाढते.

# सत्ताधारी-विरोधकांत सुंदोपसुंदी!

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही बाजूंमध्ये सुंदोपसुंदी सुरू आहे. राज्यातील युती सरकारमध्ये अंतर्गत मतभेद आणि राजकीय पेच वाढले असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गैरहजेरीसह विविध मंत्र्यांच्या भूमिकांमुळे सरकारमध्ये तणाव आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने शरद पवारांवर निशाणा साधल्याने महाविकास आघाडीतही वादावादी झाली आहे.**



महाराष्ट्रात युतीचे सरकार असले, तरी त्यामध्येही रुसवे-फुगवे सुरू आहेत, तर विरोधी असलेल्या महाविकास आघाडीमध्ये शिंदे यांच्या सत्कारानंतर शिवसेनेने (उबाठा) शरद पवारांना लक्ष्य केले आहे. आता त्याचे प्रतिध्वनी दोन्हींकडून निघत आहेत. सत्ताधारी पक्षात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शासकीय बैठकांना गैरहजर राहत आहेत. गोगावले यांच्या पालकमंत्रिपदाचा वाद अद्याप मिटलेला नाही, तर इकडे राष्ट्रवादीचे अन्न-नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा प्रश्न अजून तरंगतच राहिला आहे. भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी आता धनंजय मुंडे यांची भेट घेतली असून, आपण त्यांचा राजीनामा मागितला नाही, असे म्हणत आहेत. एकूण या सावळ्यागोंधळामुळे या दोन्ही आघाड्यांमध्ये अस्थिरता आली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपला पक्ष सक्षम व प्रभावी करण्यास घेतला आहे. माजी आमदार राजन साळवी यांनी शिवसेना शिंदे गटात आपल्या हजारो सैनिकांसोबत प्रवेश घेतला आहे. उबाठाचे पाच खासदार व चार आमदार लवकरच शिवसेना शिंदे गटात सामील होणार, अशी आवई उठताच उबाठाचे उद्धव ठाकरे आक्रमक झाले आहेत. एकही खासदार फुटला तर डोके फोडीन, असा दम देऊन नाराजी प्रकट केली आहे. तर खासदार सुरक्षित राहावेत म्हणून युवानेते आदित्य ठाकरे यांनी दिल्ली गाठली होती. नुकतीच त्यांनी संजय राऊत यांच्यासमवेत दिल्ली येथे पत्रकार परिषद घेऊन एकही खासदार तुटणार नाही, असे म्हटले असतानाच शिवसेना मंत्री प्रतापराव जाधव व शिंदेपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिल्लीमध्ये खासदारांना भोजन ठेवले होते, त्या डिप्लोमसीमध्ये उबाठाचे काही खासदार जाण्यास निघाले असता त्यांना थांबवले गेले. हे सर्व रामायण सुरू असताना एकनाथ शिंदे यांच्या सत्कारामुळे मविआमध्ये ठिणगी पडली आहे. कालपर्यंत शरद पवार यांच्या ओंजळीने पाणी पिणारे खासदार संजय राऊत यांनी शरद पवारांवर टीका केलेली आहे. आता तर पवारांना डावलून शिवसेना नेते आदित्य ठाकरे व संजय राऊत हे नवी दिल्लीत राहुल गांधी व आपचे नेते अरविंद केजरीवाल यांना भेटून पत्रकार परिषदेत सामील होत असल्याचे दिसते. एकूण हा वाद या पक्षांना कुठे नेऊन ठेवणार आहे, हेच कळत नाही. सत्ता हे प्रमुख कारण असून, ती नसली तर तळमळ होते. बाजूचा सत्ताधारी पक्षाचा खासदार व आमदार राज्य सरकारकडून निधी घेत आहे, अशावेळी विरोधी असणाऱ्या खासदार-आमदारांमध्ये निधी नसल्याने अस्वस्थता असणे साहजिकच आहे आणि त्याचाच परिणाम सत्ताधाऱ्यांमध्ये इनकमिंग सुरू आहे. आता तर महायुतीमध्ये आता बाहेरच्यांना घेण्यास जागा नाही, एवढे संख्याबळ आहे. राज्यात आता काही निवडणुका नसतानाही इनकमिंग सुरू आहे. हे कशाचे लक्षण!

सन २०२४च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा सुपडासाफ झाला. आता त्यानंतर आठ महिन्यांनी प्रदेश नेतृत्वात बदल करण्यात आले. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, अमित देशमुख, बंटी पाटील हे सर्व प्रदेशाध्यक्षपदासाठी मुंडावळ्या बांधून तयार असताना राहुल गांधींनी अचानकपणे हर्षवर्धन सपकाळ हा नवा चेहरा पुढे आणला आहे. जनतेने नाकारलेले पृथ्वीबाबा, बाळासाहेब थोरात या सर्वांना डच्चू देऊन नाना पटोले यांचीही विकेट घेतली. नवा चेहरा आणून काँग्रेस पक्ष जिवंत करण्याचा प्रयत्न वरिष्ठांनी चालविला असला, तरी महाराष्ट्रातील हे दिग्गज नेते नव्या प्रदेशाध्यक्षांच्या, सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली काम करतील, अशी शक्यता दिसत नाही.

राज्यात सध्या भाजपचा एक खांबी तंबू काम करीत असून, पक्ष सदस्य नोंदणीमध्ये आघाडीवर आहे. राजकारणात कोण कोणाचा मित्र व कोण कोणाचा शत्रू हा कायमचा नसतो. हे जरी सत्य असले, तरी सध्या जे चालले आहे, त्याचा लोकांना तिटकारा आला आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांनी अधिकाऱ्यांच्या नाड्या आवळल्या आहेत. मंत्र्यांकडे कोण पीए असावेत, हे आता मुख्यमंत्री ठरवणार आहेत. मंत्र्यांपेक्षा हे स्वीय सहाय्यक भ्रष्टाचारात अग्रेसर असतात, हे मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी या नियुक्त्यांना चाप लावला आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षं या मंत्र्यांकडून त्या मंत्र्यांकडे जाणारे-येणारे पीए अस्वस्थ झाले आहेत, यात शंका नाही. आता एक निश्चित की, सरकार कधी पडणार अशी चर्चा कुठेही होत नाही. तीन पक्षांचे प्रचंड बहुमत असले तरी भाजप हा स्वबळावर सरकार चालवू शकतो, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी अथवा राज्यातील इतर अधिकारी हे सरकार टिकेल का? अशी चर्चा करताना दिसत नाहीत; मात्र एक निश्चित की, पदांच्या वाटण्यांवरून वादळ उठले. आपत्ती व्यवस्थापन हे फार काही मोठे पद नव्हते. परंतु त्यामध्ये शिंदे यांचे नाव न आल्याने ते रुसून बसले. मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकांना त्यांनी दांड्या मारल्या. अखेर आपत्ती व्यवस्थापनामध्ये शिंदे यांचे नाव येताच ते पूर्ववत झाले. हे सर्व पाहिल्यानंतर बाबू-बाळूच्या खेळासारखे झाल्याचे चित्र महाराष्ट्रातील जनता पाहत आहे. मुख्यमंत्री हे सर्वच खात्याचे प्रमुख असतात. त्याप्रमाणे त्यांनी नगरविकास विभागाची बैठक घेतली म्हणून त्या खात्याचे मंत्री व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दोन दिवस बैठकीला आलेच नाहीत. त्यावरून अंतर्गत रणकंद झाले, हे योग्य नव्हते.

एकनाथ शिंदे यांचा शरद पवार यांनी सत्कार केल्यानंतर उबाठाची जी तडफड झाली त्याला सीमाच नव्हती. यासंदर्भात बोलताना खा. संजय राऊत म्हणाले, 'मराठी साहित्य संमेलन ही राजकीय दलाली आहे.' यापूर्वी विधानसभेचा हक्कभंग करताना अशाच पद्धतीची भाषा राऊत यांनी वापरली होती. शब्द हे शस्त्र आहेत, याचे भान राऊत यांना नाही. साहित्य संमेलनासंदर्भात जे भाष्य केले आहे, त्याच्या प्रतिक्रिया साहित्य संमेलनात उमटणार यात शंका नाही. नवी दिल्लीमध्ये हे साहित्य संमेलन होणार असून, त्याचे स्वागताध्यक्ष शरद पवार हे आहेत. अशावेळी खा. संजय राऊत यांनी जे शब्द वापरले आहेत ते कितपत योग्य आहेत? मराठी साहित्य संमेलन हे मराठी भाषेचे कला मंदिर आहे. त्यावर टीका करताना आपली योग्यता तपासणे आवश्यक आहे. ती न तपासता वारेमाप तोंडात येईल तसे बोलणे हे योग्य नाही. साहित्य संमेलन म्हटले की, सर्वच पक्षाचे नेते त्यामध्ये असतात. हे काही आजचे नाही. साहित्य संमेलन ही मराठी माणसाची अस्मिता आहे, याचे भानही राऊत यांना नसावे ही शोकांतिका म्हटली पाहिजे. आता नवी दिल्लील साहित्य संमेलन होत असून, तेथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दस्तुरखुर्द शरद पवार यांनी निमंत्रित केले आहे. तीच खरी पोटदुखी खासदार संजय राऊत यांना असावी.

# 'विवाद से विश्वास'चा विषाद...

**आयकराबाबतच्या थकलेल्या विवादांची तड लावण्यासाठी सध्या 'विवाद से विश्वास योजना' राबवली जात आहे; पण तिच्या अंमलबजावणीतील त्रुटी विषादानेच नमूद कराव्या लागतात, असा अनुभव. या त्रुटी सुधारताही येतील...**

आयकर (इन्कम टॅक्स) या विषयात असंख्य करदात्यांचे अनेक प्रकारचे करविवाद नेहमीच चालू असतात व तसे ते सध्याही मोठ्या प्रमाणात चालू आहेत. नव्याने दाखल होणाऱ्या विवादांची (अपील्स) संख्या, ही निपटारा होत असलेल्या विवादांपेक्षा खूपच जास्त आहे असे प्रत्यक्ष अर्थमंत्र्यांनीच लोकसभेत, त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात सांगितले आहे. इन्कम टॅक्स अपिलांच्या सुनावण्या 'फेसलेस' पद्धतीने सुरू झाल्यापासून तर हा निपटारा खूपच संथ गतीने होत आहे असे दिसते. त्यामुळे सरकारला कागदोपत्री येणे असलेल्या इन्कम टॅक्सच्या रकमा या (करदात्यांच्या बाजूने निकाली निघून) रद्दही होत नाहीत आणि त्या विवादित असल्याने पूर्णतः वसूलही करता येत नाहीत अशी स्थिती उद्भवते. सरकारी भाषेत अशा वसूल न होणाऱ्या पण कागदोपत्री मात्र येणे दिसणाऱ्या रकमांना 'पेपर डिमांड्स' असे म्हणतात. त्या कमी होण्यासाठी अनेकदा सरकारकडून निरनिराळ्या योजना जाहीर केल्या जातात. तशीच एक योजना केंद्र सरकारने याही विषयात आणली आहे.

**योजना व तिचे स्वरूप :** केंद्र सरकारने यापूर्वी २०२० मध्ये आणलेली ह्यप्रत्यक्ष कर–विवाद से विश्वास योजनाह्ण ही योजना फक्त चारच वर्षांत पुन्हा एकदा, त्याच नावाने आणली आहे. या योजनेचे स्वरूप हे एक तडजोड/सामोपचार योजना असे असून त्यात करदात्यांना काही बाबतींत अभयही देण्यात आले आहे. करदात्यांनी विशिष्ट मुदतीत विवादित कर पूर्णपणे भरल्यास त्या करांवरील वरील व्याज आणि त्यासंबंधात लागू शकणारे काही दंड(पेनल्टीज) यांपासून पूर्णतः मुक्ती मिळणार, अशी थोडक्यात ही योजना आहे. जुलै २०२४ मधील अर्थसंकल्पीय भाषणात घोषित केलेली ही योजना एव्हाना कार्यान्वित झाली असून तिचा पहिला टप्पा ३१ जानेवारीला संपला आहे.

**प्रत्यक्षातील अनुभव :** कुठल्याही सरकारने आणलेल्या कुठल्याही लाभार्थी योजनेच्या बाबतीत, ती कागदावरून व्यवहारात अवतीर्ण होताना आणि ती तशी अवतीर्ण झाल्यावरही, तिच्या प्रत्येक टप्प्यावर जसे अनुभव येत जातात, तसे ते याही योजनेत येत आहेत. अशा योजनांतून लोकांना मिळणारे संभाव्य लाभ कसे आक्रसता येतील, त्यांत अडथळे कसे निर्माण करता येतील याचेच जणू प्रयत्न नोकरशाहीकडून केले जातात की काय, असे वाटायला लावणारे अनुभव आणि त्यांतून निर्माण होत असलेल्या समस्यांपैकी काहींचा, अगदी थोडक्यात आढावा :

(१) **अधिकारी जणू कायद्याहून श्रेष्ठ :** संसदेने मंजूर केलेल्या वित्त विधेयकात असे स्पष्ट म्हटले आहे की २२ जुलै २०२४ रोजी जे आयकर विवाद प्रलंबित होते ते सर्व या योजनेत मिटवता येतील. पण काही सरकारी अधिकारी हे स्वतःला सरकारच्याही वर समजत असतात हा अनुभव इथेही आला. आयकर खात्याकडून या योजनेबाबत सुरुवातीला प्रश्नोत्तर रूपाने जो अधिकृत खुलासा केला गेला त्यात असे सांगितले गेले की २२ जुलै २०२४ ला प्रलंबित असलेले करविवाद या योजनेखाली अर्ज करतेवेळी निकाली निघालेले असतील, तर आता त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. त्यामुळे ज्या करदात्यांना २२ जुलै २०२४ नंतर, दरम्यानच्या काळात प्रतिकूल निकाल मिळाले आहेत, त्यांना या योजनेचा लाभच मिळणार नाही अशी विचित्र व पूर्णतः अनपेक्षित परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावर टीका सुरू झाल्यावर आणि हा खुलासा चुकीचा आहे हे करदाते/ करसल्लागार यांच्या संघटनांनी आयकर खात्याच्या लक्षात आणून दिल्यानंतर, बऱ्याच कालांतराने यातील चूक मान्य झाली आहे व नंतर जारी केलेल्या खुलाशांत त्याची दुरुस्ती केली गेली आहे.


(२) **'जमेल तैसी देऊ सेवा' :** करदात्याने या योजनेखाली नमुना-एकमध्ये अर्ज केल्यावर त्याला १५ दिवसांत नमुना-दोनमध्ये त्याबाबतचा प्रतिसाद (प्रमाणपत्र) पाठवणे, अशी अत्यंत महत्त्वाची जबादारी या योजनेत आयकर अधिकाऱ्यांवर कायद्याने सोपवलेली आहे. पण अनेक प्रकरणांत, करदात्यांनी अर्ज करून महिना-दीड महिना होत आला तरीही काहीच प्रतिसाद मिळत नाही, असे अनुभव येत आहेत. ''आमच्यासाठीसुद्धा असा काही कालावधी निश्चित केला आहे का? तसे कुठे लिहिले आहे का?'' असे प्रश्न आयकर खात्यातील अधिकाऱ्यांनीच करदात्यांच्या करसल्लागारांना विचारले, असेही अनुभव येत आहेत.

(३) **रोज लॉग–इन करा आणि बघत बसा :** या योजनेखाली नमुना-एकमध्ये अर्ज करताना त्यांत सुरुवातीलाच करदात्यांचा ई-मेल आयडी व मोबाइल फोन नंबर लिहावा लागतो. नमुना एकमध्ये अर्ज केल्यावर त्या अजार्तील तपशील आहे तसा स्वीकारला गेला आहे, की त्यात नमूद केलेल्या देय रकमेत काही बदल झाले आहेत, इत्यादीचे प्रमाणपत्र वर लिहिल्याप्रमाणे नमुना-दोनमध्ये अर्जदार करदात्याला मिळणे अपेक्षित आहे. ते प्रमाणपत्र आपल्या ईमेलवर पाठवले जाईल असे अनेक करदात्यांना वाटत होते व अजूनही वाटते आहे. पण अर्ज करून बरेच दिवस वाट पाहिल्यानंतर त्यांना आता हे कळते आहे की सदर प्रमाणपत्र त्यांच्या मेलवर न पाठवता, त्यांच्या इन्कम टॅक्स पोर्टलवरील पॅन -लॉगइन खात्यात अपलोड करून ठेवण्यात आले आहे. त्याबाबत त्यांना कुठलाही मेल/ एसएमएस पाठवण्यात आलेला नाही. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे हे नमुना-दोनमधील प्रमाणपत्र मिळाल्यानंतर करदात्याने १५ दिवसांच्या आत, त्यामध्ये प्रमाणित केलेला कर सरकारकडे भरावयाचा आहे. तसा तो नाही केला, तर करदाता या योजनेसाठी अपात्र ठरणार आहे. त्यामुळे हे प्रमाणपत्र अपलोड केले असल्याचा मेल आणि मेसेज करदात्याला मिळणे सोयीचे ठरेल, जेणेकरून तो त्यात नमूद केलेली रक्कम १५ दिवसांत भरू शकेल.

(४) **बंद खिडक्यांचे प्रश्न :** या योजनेचा लाभ घेताना करदात्याने आधी दाखल केलेला विवाद (अपील्स इत्यादी) विनाशर्त परत घेणे अपेक्षित आहे. अशा प्रकारे अपील परत घेतल्याचा (विथड्रॉ केल्याचा) पुरावा म्हणून त्याच्या पोचपावतीचा तपशील त्याने सादर करायचा आहे. पण ज्या करदात्यांची विवाद अपिले प्रलंबित आहेत अशांपैकी काहींच्या बाबतीत, अपील करून बराच काळ झालेला असतानाही, ती अपिले परत/मागे घेण्यासाठी आवश्यक असलेली 'अपील विंडो' इन्कम टॅक्स पोर्टलवर अजूनही उपलब्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांनी याबाबतीत कसे आणि काय करायचे हा प्रश्न अजूनही अनुत्तरितच दिसत आहे.

(५) **इथे विलंबाला माफी नाही :** या योजनेत अजून एक वेगळाच असा मुद्दा तयार झाला की जो करविवाद २२ जुलैपूर्वीच निर्माण झालेला होता पण त्याबाबतचे अपील दाखल करायची कायदेशीर मुदत मात्र २२ जुलै २०२४ रोजी संपलेली नव्हती, अशा विवादांनाही या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे होता. पण तो देण्यात आला नव्हता. या विषयात कोर्टबाजी झाल्यानंतर आयकर खात्याने जो आदेश आता काढला आहे त्यात असे लिहिले आहे की अशी जी अपिले २२ जुलै २०२४ नंतर दाखल केली आहेत त्यांतील विवादांनाही या योजनेचा लाभ घेता येईल, मात्र ती अपिले विहित वेळेतच सादर झालेली असली पाहिजेत (त्यांत एक दिवसाचासुद्धा विलंब असता कामा नये). वास्तविक अनेक खऱ्या आणि योग्य कारणांनी अपील दाखल करण्यात अनेकदा असे विलंब होत असतात व अपिलीय अधिकाऱ्यांकडून ते माफही करण्यात येतात. असे असतानाही काढलेले हे असले आदेश, हे या योजनांच्या मागे जो हेतू आहे त्यालाच छेद देतात. कारण योजनेचा मुख्य हेतू कर विवाद कमी करणे हा आहे.

या मुद्द्यांवर विचार होऊन त्याबाबत योग्य ते बदल व सुधारणा झाल्या, तर या योजनेचे यश अधिकच वाढेल. अन्यथा यांतून पुन्हा विवादच वाढण्याची खूप शक्यता आहे. ही योजना फेब्रुवारी अखेरपर्यंत चालू आहे व बहुधा तिची मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवली जाईल अशीही एक चर्चा ऐकिवात आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत अनुभवास येत असलेल्या त्रुटी/अडचणी दूर करून, तिची मुदत खरेच वाढवली गेली, तर संबंधित सर्वांचेच भले होईल असे वाटते!



## छोले सॅलड

**साहित्य :** २०० ग्रॅम छोले (७-८ तास भिजवून उकडून घेतलेले), १ कांदा बारीक चिरलेला, २ चेरी टोमॅटो बारीक चिरलेले, वरून भुरभुरण्यासाठी पार्सली, २ चमचे ऑलिव्ह ऑइल, २ चमचे बारीक चिरलेली लसूण, १ चमचा चिली फ्लेक्स, २-३ चमचे लिंबाचा रस, मीठ, मिरपूड.

**कृती:** एका वाडग्यामध्ये लसूण, ऑलिव्ह ऑइल, मीठ मिरपूड, चिली फ्लेक्स आणि लिंबाचा रस एकत्र ढवळून घ्या. उकडलेल्या छोल्यांमध्ये ते मिसळा. आता यात कांदा, टोमॅटो घालून घ्या. नीट मिसळून थंड करायला ठेवा. वरून पार्सली भुरभुरा. छोले चाट आपण नेहमीच करतो पण हे आणखी थोडं वेगळ्या चवीचं सॅलड. यामध्ये छोल्यांऐवजी राजमाही वापरता येईल. पॅन टॉस करून पास्ताही त्यात मिसळता येईल.

# तरुण दिसायचे आहे, मग तुमच्यासाठी खास टिप्स...

सर्वच तरुणींना आपली त्वचा सुंदर असावी, आपण छान दिसावे असे वाटत असते. मात्र सर्वांनाच ते जमत नाही, कारण आपण जो फेस पॅकचा वापर करतो तो तितकीच त्वचा गोरी करतो. तुमच्या शरीराचा प्रत्येक भाग छान दिसण्यासाठी आम्ही तुम्हाला देत आहोत काही खास टिप्स, त्या पुढीलप्रमाणे :



■ ज्या लोकांना कोणतीही ॲलर्जी असते अशा लोकांनी मध व दुधात स्नान करणे फायदेशीर असते. या स्नानामुळे त्वचेला अंतर्गत पोषण मिळते. ■ त्वच्या कोमल होण्यासाठी दूध आणि मध एकत्र मिक्स करून स्नान केल्यास त्वच्या कोमल राहते. दुधामधील प्रोटीन आणि फॅटचे प्रमाण त्वचेला आतून एक्सफोलिएट करण्याचे काम करते. याव्यतिरिक्त दुधातील लॅक्टिक ॲसिड मृत पेशींना दूर करण्याचे काम करते. त्यामुळे त्वचेवरील ड्रायनेस कमी होतो. ■ तसेच या स्नानामुळे तुम्ही लवकर वृद्ध होणार नाही त्यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. ■ मध आणि दूध एकत्रित घेतल्यास थेट नर्व्हस सिस्टमवर प्रभाव पडतो. दूध त्वचेला कोमल बनवते तर मध त्वचेला नवजीवन प्रदान करते. ■ अरोमासाठी सी सॉल्ट आणि लेव्हेंडर ऑइल वापरले जाते. तणाव दूर करण्यासाठी सुद्धा या मिश्रणाने स्नान केले जाते.

# धणे-हळदीच्या मिश्रणाने दूर करा पिंपल, ब्लॅकहेड्सची समस्या!

**चेर्हयावरचे** डाग, ॲक्ने, ब्लॅकहेड्सच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी तुम्ही ब्युटीपार्लरमध्ये काही ट्रीटमेंट्स घेतल्या असतील. पण काही घरगुती उपायांनी अगदी सुरक्षितरित्या तुम्ही या समस्येपासून सुटका मिळवू शकता. असाच एक उपाय म्हणजे 'धणे'!

**फायदेशीर उपाय –** धण्याचं (कोथिंबीरीच्या बिया) पाणी आणि हळद एकत्र करून चेर्हयाला लावावे. यामधील अँन्टीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचेवर पिंपल्सची निर्मिती करणार्या बॅक्टेरियांचा नाश करतात. कोथिंबीरीमध्ये 86.3% मॉईश्चर असते. यामुळे त्वचा रिहायड्रेट होण्यास मदत होते. यामुळे चेर्हयावरील डाग कमी होण्यास मदत होते. हळद आणि कोथिंबीर या दोन्हींमध्ये ॲन्टीऑक्सिडंट्स आणि व्हिटामिन्सचा मुबलक साठा असल्याने त्वचेचा पोत सुधारण्यासाठी मदत होते.





**साहित्य–**

▮ दोन चमचे धणे ▮ चमचाभर हळद ▮ ग्लासभर पाणी

**कसे बनवाल मिश्रण**

▮ ग्लासभर पाण्यात धण्याचे दाणे टाकून पाणी उकळा. पाण्याचा रंग बदलल्यानंतर गॅस बंद करा. मिश्रण थंड झाल्यानंतर पाणी गाळून घ्या. ▮ या पाण्यात थोडी हळद मिसळून पेस्ट बनवा. मात्र अतिप्रमाणात हळद वापरू नका, अन्यथा चेहरा पिवळा होईल. ▮ रात्री हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि सकाळी चेहरा स्वच्छ धुवा. ▮ सतत तीन-चार रात्री हा प्रयोग केल्यास तुमच्या चेहऱ्यावरील डाग, ॲक्ने कमी होण्यास मदत होईल.

# म्हातारपणात सर्वात जास्त होतात हे ३ आजार, ५० वर्षांचे झाले असाल तर सावध व्हा

**म्हातारपणात** मनुष्याला काही आजारपण जास्त त्रास देतात. हे आजार म्हातारपणाचे दुखणे अधिक वाढवतात. एक्सपर्टचे म्हणणे आहे की, वाढत्या वयात मनुष्याच्या शरीराची प्रतिरोधक क्षमता कमी होऊ लागते आणि त्याला बरेच आजार होऊ लागतात. पण काही असे आजार आहे जे ५० वर्षांहून जास्त वयाच्या महिला आणि पुरुषांना सर्वात जास्त होतात. तर जाणून घेऊ कोणते गंभीर आजार आहेत जे ५० वर्षांनंतर जास्त होतात.

### हृदयरोग

सेंटर्स ऑफ डिसिज कंट्रोल अँड प्रीव्हेंशनचे म्हणणे आहे की, अमेरिकेत हृदयरोग पहिल्या क्रमांकावर आहे, जो म्हाताऱ्यांमध्ये जास्त दिसून येतो. ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर हा आजार वाढू लागतो. भारतीय म्हाताऱ्यांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून आला आहे.

### कर्करोग

सेंटर फॉर डिसिज कंट्रोलचे म्हणणे आहे की, हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर म्हाताऱ्यांमध्ये होणारे आजार म्हणजे कर्करोग. अमेरिकेत हार्ट ॲटॅकनंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात जास्त मृत्यू कर्करोगामुळे होते. ५० वर्षांनंतर पुरुषांमध्ये लंग कर्करोगाचा धोका वाढू लागतो. तसेच महिलांमध्ये या वयात सर्वात जास्त स्तन कर्करोगाची लक्षणे दिसू लागतात. फुफ्फुस आणि स्तन कर्करोगानंतर पोटाचा आणि प्रोटेस्टेट कर्करोगाचा धोका वाढू लागतो.

### स्ट्रोक

स्ट्रोक मस्तिष्क संबंधी आजारांमध्ये सर्वात सामान्य आजार आहेत. अमेरिकेत हार्ट ॲटॅक आणि कर्करोगानंतर सर्वात जास्त रुग्णांचा मृत्यू या आजारामुळे होतो. हे आजार सर्वात जास्त म्हाताऱ्या लोकांना प्रभावित करतात.



# असे बनवा लोणचे, तर वाढेल चव आणि रंगत...

कैरीचे लोणचे, लिंबाचे लोणचे, मिरचीचे लोणचे, व्हेज लोणचे, अनेक प्रकाराचे लोणचे घरी अगदी आरामात तयार केले जातात. पण हेच लोणचे अधिक चविष्ट बनवण्यासाठी काही सोप्या टिप्स. याने लोणचाच्या रंगही आकर्षक दिसेल.

▮ रंग आणि चव हे दोन्ही वाढवण्यासाठी लोणच्याचा तेलात गरम न करता मोहरीचे तेल घालायला हवं ▮ गोड आंब्याच्या लोणच्यात साखर मिसळून गॅसवर शिजवावे. ▮ चविष्ट लोणचे बनवण्यासाठी कुटलेली नव्हे तर अख्खी मोहरी वापरायला हवी.



# टेम्पर्ड ग्लास असूनही का खराब होते मोबाइल स्क्रीन

फोनच्या स्क्रीनला संरक्षण देण्यासाठी तुम्ही देखील टेम्पर्ड ग्लास वापरत असाल. बऱ्याच प्रसंगी हे टेम्पर्ड ग्लासेस फक्त फोन स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण, गार्ड डिस्प्ले क्रॅक होण्यापासून वाचवू शकत नाहीत.

**स्मार्टफोनला** कोणत्याही प्रकारचे नुकसान पोहचू नये आणि संरक्षणाचा अतिरिक्त स्तर देण्यासाठी युजर्स स्क्रीन गार्ड वापरतात. बाजारात अनेक प्रकारचे स्क्रीन गार्ड उपलब्ध आहेत. काही लोक त्यांना टेम्पर्ड ग्लास असेही म्हणतात. तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्याकडून स्क्रीन गार्ड विकत घेतल्यास ते जवळपास १०० रुपयांमध्ये सुद्धा मिळेल. काहींना तर, तर ५० रुपयांतही मिळू शकतात. स्मार्टफोनच्या मॉडेलनुसार त्याची किंमत अनेक वेळा वाढते. दुसरीकडे, जर तुम्ही ऑनलाइन गेलात, तर तुम्हाला हे स्क्रीन गार्ड १०० रुपयांपासून ते १००० रुपयांपर्यंतच्या किमतीत मिळतात. स्क्रीन गार्डसाठी इतक्या किमती का? असा प्रश्न तुम्हालाही पडत असेल.



**स्क्रीन का तुटते ?**

तुम्हाला फोनची स्क्रीन स्क्रॅचपासून वाचवायची असेल, तर हे स्वस्त गार्ड हे काम अगदी सहज करू शकतात. परंतु, काही वेळा ते स्क्रीन तुटण्याचे कारणही बनते. डिस्प्लेवर जाड स्क्रीन गार्ड लावल्यानंतर स्क्रीन आणि कव्हरमधील अंतर संपते. यामुळे, तुमचा फोन पडताच, त्याचा परिणाम डिस्प्लेवर पडतो, जो स्क्रीन गार्ड नसेल तर, कमी होऊ शकते.

टेम्पर्ड ग्लास ऑनलाइन शोधल्यास तुम्हाला १०० रुपयांपासून ते २००० रुपयांपेक्षा अधिक किमतीचे गार्ड उपलब्ध असल्याचे दिसून येईल. महत्त्वाचे म्हणजे या टेम्पर्ड ग्लासची किंमत बाजाराच्या तुलनेत खूपच कमी आहे.

### महागड्या स्क्रीन गार्डमध्ये काय खास आहे?

बाजारात उपलब्ध असलेले स्वस्त टेम्पर्ड ग्लास किंवा स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या फोनच्या स्क्रीनला स्क्रॅचपासून वाचवू शकतात. पण तुमचा फोन पडला तर हे गार्ड त्यांना सुरक्षित करू शकत नाहीत. स्मार्टफोनची स्क्रीन तुटली नाही तर नशीबच. दुसरीकडे २००० रुपये खर्चून येणारे स्क्रीन प्रोटेक्टर तुमच्या स्क्रीनचे संरक्षण करू शकतात. हे गार्ड तयार करताना उत्तम तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यांना अशा पद्धतीने बनवण्यात येते की, पडदा पडल्यावर स्क्रीनवर थेट दाब येत नाही. त्याचबरोबर यामध्ये वापरण्यात आलेली काच देखील सामान्यपेक्षा खूपच वेगळी असते आणि हेच त्यांची किंमत जास्त असण्याचे कारण असते.

## महत्त्वाचा कानमंत्र

• बोरे, अंजीर, पेरू यामध्ये अळ्या असण्याची शक्यता असते. म्हणूनच ही फळे धुवून, कापून खावीत.

• तेलकट कपडे धुताना पाण्यात साबणाबरोबर २-४ चमचे साखर टाकावी आणि त्यात कपडे भिजवावेत.



यामुळे तेलकटपणा लगेचच जातो.


• फ्रीज साफ करताना कोमट पाण्यात थोडा सोडा घालून मऊसर कपड्याने पुसून घ्यावा. यामुळे फ्रीज स्वच्छ होतो.

• सिल्कचे ब्लाऊज सौम्य शाम्पूने धुवावे. म्हणजे रंग जात नाही आणि खराबही होत नाही.

• केराच्या बादलीत थोडेसे फिनेल शिंपडून ठेवल्यास घाण वास येत नाही आणि त्याभोवती चिलटे घोंगावत नाहीत.

• केसांवर अथवा कपड्यांवर च्युइंगम चिकटले असल्यास त्यावर बर्फाचा खडा फिरवावा. यामुळे चिकटलेले च्युइंगम लगेचच निघते.

# रंगाला अनुसरून करा मेकअप



**गोऱ्या रंगासाठी :**

आपला रंग गोरा असेल तर ती निसर्गाकडून मिळालेली उत्तम देणगी आहे. पण जर गोरा असूनही आपला रंग काहीसा दबल्यासारखा वाटत असेल तर त्यावरही उपाय आहे. त्यात चमक आणण्यासाठी पीच वा शियर ब्रांझ ब्लशर लावायला हवा. तो नैसर्गिक रंगात राखू इच्छित असाल तर पेल पिंक रंगाची शेडही सोबत लावा. डोळ्यांना नेव्ही ब्ल्यू, सिल्व्हर ग्रे, सॉफ्ट पेस्टल, लायलॅक, स्काय ब्ल्यू, वा टेराकोटा रंग खूप शोभेल. तसेच न्यूड, बेबी पिंक, रोझी ब्राऊन व शिअर रोड लिपस्टिक वापरायला हवी.



**गडद रंगाच्या त्वचेसाठी :**

ब्लशरमध्ये डीफ प्लम, डार्क रोझ वा करेंट लावावे. डोळ्यांच्या सौंदर्यासाठी ब्राऊन मॅट, गोल्ड ब्रांझ वा सिल्व्हरची शिमरी शेड लावावी. लिपस्टिकसाठी ब्लॅक बेरी, पिच, डीफ रेड, पर्पल, कॅरेमल यापैकी कोणताही रंग निवडू शकता.

**पिवळ्या रंगाची त्वचा :**

या त्वचेवर लाल वा नारंगी रंगाचा वापर करू नये. ब्राऊनिश रोझ वा कोको ब्राऊन, डीफ पर्पल वा मिडलाईट ब्ल्यऊआयशॅडो वापरावा. ओठ सुंदर दिसण्यासाठी रोझी बेझ, डीफ रेड वा शियर ब्राऊन यापैकी काहीही लावू शकतात.



**गव्हाळ त्वचेसाठी :**

या रंगाची रंगत वाढवण्यासाठी रोझ शेड वा म्युटेड टाऊनी ब्लशर वापरावा. ऑरेंज बेस कधीही लावू नये. डोळ्यांसाठी अर्थ टेन शेड म्हणजेच डार्क ग्रे, बेझ, मशरुम शेड वापरू शकता. ओठ नॅचरल दिसण्यासाठी शियर वा बेरी टिंटेड ग्लास लावावेत.

# डेंग्यूचा ताप या समस्या निर्माण करतो

डेंग्यूचा ताप हा एक व्हायरल एडीस इजिप्ती डासांनी पसरणारे संक्रमण आहे. असा ताप आला असता लगेच उपचार न केल्याने रुग्णाची परिस्थिती गंभीर होऊ शकते. यासाठी डेंग्यूचा उपचार वेळेवर करणे गरजेचे आहे. डेंग्यूच्या तापाने शरीरावर रक्ताचे डाग आणि डेंग्यू आघात सिंड्रोम सारखी लक्षणे निर्माण होऊ शकतात. यामुळे फुफ्फुस, यकृत आणि हृदयाला धोका निर्माण होतो.

**काय आहेत डेंग्यूच्या तापाची लक्षणे –**

- पोटात दुखणे
- नाक, तोंड आणि हिरड्यातून रक्तस्राव होणे
- रक्ताची किंवा सुकी उलटी होणे
- भूक कमी होणे
- थकवा येणे
- सांधे किंवा मांसपेशी दुखणे

**डेंग्यू आघाताचे सिंड्रोम–**

डेंग्यू आघात सिंड्रोममुळे त्वचेवर रक्ताचे छोटे डाग दिसतात आणि त्वचेच्या खाली रक्ताचे मोठे डाग दिसू शकतात.

- ब्लड प्रेशर कमी होते
- श्वास घेताना त्रास होतो
- थंड आणि चिकट त्वचा
- तोंड कोरडे पडते
- अस्वस्थता जाणवते



# खाल्ल्या मिठाचे परिणाम

**खाल्ल्या** मिठाला जागावे असे आपले नीतीशास्त्र सांगते. सगळेच लोक खाल्ल्या मिठाला जागत नाहीत. पण मीठ मात्र याबाबतीत पक्के कृतज्ञ असते. जो जास्त मीठ खाईल त्याच्या शरीरात मीठ अगदी इमानदारीने आपले परिणाम दाखवतेच. एखादा पदार्थ थोडेसे जादा मीठ घालून खाल्ला तर बरा लागतो, परंतु हेच मीठ आपल्या शरीराचा शत्रू बनत असते. आपण कितीही दुर्लक्ष केले तरी मीठ आपला प्रताप दाखवतेच. अधिक मीठ खाल्ल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास होतो हे तर सर्वांना माहीतच झालेले आहे. म्हणून रक्तदाबाची तक्रार घेऊन एखादा पेशंट डॉक्टरकडे जातो तेव्हा डॉक्टर रक्तदाबाची गोळी तर देतातच पण मीठ कमी खाण्याचा सल्ला देतात.

ज्यादा मीठ खाल्ल्याने हृदयविकाराची शक्यता वाढते. त्याचबरोबर रक्तदाब वाढल्यामुळे आणि शरीराच्या हालचाली कमी झाल्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमी होते. मिठातील सोडियममुळे मूत्रपिंडाच्या कार्यावरही परिणाम होतो. मूत्रपिंड हे शरीराच्या रक्तातील अशुद्ध घटक गाळून रक्ताला शुद्ध घटक मिळवून देणारा अवयव असतो. ते एक प्रकारचे फिल्टर असते. मात्र हे फिल्टर मिठामुळे बाधित होते आणि फिल्टरचे काम म्हणावे तसे होत नाही. रक्तात अशुद्ध घटक मिसळले जातात आणि त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. ज्यादा मीठ खाण्याने त्वचेवरही परिणाम होतात. त्वचा फुगायला लागते. म्हणजे चेहरा, हात, पाय, विशेषतः मनगट सुजल्यासारखे होते.



# व्यायामाचेही व्यसन नको

**शरीर** तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मन मजबूत राहण्यासाठी व्यायाम करणे आवश्यकच आहे. व्यायामाच्या गरजेबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु काही मानसशास्त्रज्ञ व्यायामाच्या बाबतीत एक इशारा देत आहेत की व्यायाम करा पण व्यायामाचे व्यसन लावून घेऊ नका. व्यायामाच्या अनावश्यक आहारी जाऊ नका.

दारू पिणारा माणूस जसा एडिक्ट होण्याची शक्यता असते तसेच व्यायाम करणाराही व्यायामाच्या बाबतीत एडिक्ट होण्याची भीती असते आणि म्हणून आपण व्यायाम करत आहोत की नाही हे तर पहाच पण आपण व्यायामाच्या बाबतीत व्यसन लावून घेत आहोत की काय यावरही लक्ष ठेवा, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

शरीर तंदुरुस्त असले पाहिजेच, परंतु आपल्या दिवसातले सारे रुटीन केवळ त्यासाठीच्या व्यायामाच्या भोवती गुंफले जात असेल तर हा धोका संभवतो. जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा शरीरातून एण्डॉर्फिन आणि सेरेटोनिन ही दोन द्रव्ये पाझरत असतात. त्यांचा उपयोग आपल्याला होत असतो. एण्डॉर्फिनमुळे मानसिक डिप्रेशन कमी होते तर सेरेटोनिनमुळे मनावरचा ताण कमी होतो. मात्र आपण या स्थितीच्या आहारी गेलो तर आपल्या स्नायूंमध्ये काही दोष निर्माण होण्याची शक्यता असते.

एवढेच नव्हे तर व्यायाम केल्याशिवाय पर्यायच नाही अशी स्थिती निर्माण होऊन एखादा दिवस व्यायाम बुडत असेल तर त्या दिवशीच्या त्या भावनेपोटी काही शारीरिक कटकटीही निर्माण होत असतात. तेव्हा एखादा दिवस व्यायाम केला नाही तर फार मोठे नुकसान होईल ही भावना मनातून काढली पाहिजे. व्यायामातून निर्माण होणारी शरीराची तंदुरुस्ती ही स्वागतार्हच असते. परंतु आपल्या आयुष्याला परिपूर्णता येण्यासाठी एवढी एकच गोष्ट आवश्यक नाही.

व्यायामसुद्धा मोजकाच आणि नेमकाच करावा. परंतु काही लोकांच्या मनामध्ये असा गैरसमज असतो की जितका जास्त वेळ व्यायाम तेवढे आरोग्य उत्तम. वास्तविक हा गैरसमज आहे. शरीरसुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तंदुरुस्त होत असते. त्या मर्यादेपर्यंत शरीर मजबूत होण्यासाठी जेवढा व्यायाम आवश्यक आहे तेवढाच व्यायाम केला पाहिजे. उगाच फार मोठी बॉडीबिल्डिंग होईल म्हणून अधिकाधिक वेळ जीममध्ये काढायला लागलो तर त्याचा फायदा तर होत नाहीच पण जीममधला तो अनावश्यक वेळ वाया जातो. ज्याचा इतर कामांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.



# उभे राहून पाणी प्यायल्याने होऊ शकतात 'हे' त्रास

**आपण** अनेकदा बाहेरून घरी आल्यानंतर किंवा खेळून आल्यानंतर उभे राहून घटाघटा पाणी पितो. ही सवय आपल्या आरोग्याला अपायकारक ठरू शकते. उभे राहून पाणी प्यायल्याने गॅसेसचा किंवा किडनीसंबंधी समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे पाणी बसून प्यायलेले केव्हाही चांगले. बाहेरून दमून किंवा उन्हातून आल्यावर आपण घटाघटा पाणी पितो तेव्हा घरातील मोठ्यांकडून आपण ओरडा खातो. आता असे उभे राहून पाणी पिण्याचे कोणते त्रास होतात पाहूया...



**पचनाचे विकार –**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरात अतिशय वेगाने खाली जाते. अशामुळे अन्ननलिकेवर ताण येतो आणि असे वारंवार झाल्यास पचन प्रक्रियेत समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

**किडनीचे विकार –**

उभे राहून पाणी प्यायल्यास ते शरीरातून वेगाने वाहून जाते. शरीरातील अनावश्यक घटक वाहून नेण्याचे काम पाण्याद्वारे केले जाते. मात्र, उभे राहून पाणी प्यायल्याने ही प्रक्रिया योग्य पद्धतीने होत नाही. यामध्ये किडनी आणि मूत्राशयातील अनावश्यक घटक तसेच राहतात. त्यामुळे मूत्रमार्ग किंवा किडनीत संसर्ग होण्याची शक्यता वाढते आणि किडनीचे विकार होण्याची शक्यता जास्त असते.

**सांधेदुखी –**

उभ्याने आणि घाईघाईने पाणी पिण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक आहे. अशाप्रकारे पाणी प्यायल्याने शरीराच्या सांध्यांतील द्रव पदार्थांचे संतुलन बिघडते त्यामुळे सांधेदुखीचा त्रास होण्याची शक्यता असते.

## डोंबिवलीत ६५ बेकायदा इमारती उभारणीस पाठबळ देणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करा

# शिवसेना ठाकरे गटाची आयुक्तांकडे मागणी



**कल्याण :** डोंबिवलीत मागील पाच ते सहा वर्षांच्या काळात ६५ महारेरा प्रकरणातील बेकायदा इमारती उभ्या राहिल्या. त्यावेळी कल्याण-डोंबिवली पालिकेतील ज्या उपायुक्त, साहाय्यक आयुक्त आणि नियंत्रक अधिकाऱ्यांनी या बेकायदा इमारतींवर कारवाई न करता त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. अशा सर्व पालिका अधिकाऱ्यांची चौकशी सुरू करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ठाकरे गटाचे डोंबिवली विभागाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे मंगळवारी केली आहे.

आयुक्तांनीही याप्रकरणात सहभागी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे आश्वासन जिल्हाप्रमुख म्हात्रे यांना दिले. या बेकायदा इमारती उभ्या राहत उपायुक्त, प्रभागस्तरावरील साहाय्यक आयुक्त, कनिष्ठ अभियंता, बीट मुकादम यांनी दखल घेतली नाही. या बांधकामांवर त्यावेळीच कारवाई झाली असती तर आता नऊ हजार कुटुंबांवर बेघर होण्याची वेळ आली नसती, असे म्हात्रे यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणले.

६५ बेकायदा इमारतीत घरे घेताना रहिवाशांनी कल्याण डोंबिवली पालिकेची बांधकाम परवानगीची कागदपत्रे, महारेराचे नोंदणी प्रमाणपत्र, दस्त नोंदणी केलेली कागदपत्रे पाहून या इमारतींमध्ये घरे घेतली. ही कागदपत्रे पाहून बँकांनी घरे घेण्यासाठी या रहिवाशांना कर्जे दिली. रहिवाशांची कोणतीही चूक नसताना लोक मात्र आता या कारवाईत भरडले जात आहेत. बँकांनी इमारतींची कागदपत्रे योग्यरितीने तपासली असती तर त्याचवेळी ही कागदपत्रे बनावट असल्याचे निष्पन्न होऊन नागरिकांची फसवणूक टळली असती. या प्रकरणात बँक अधिकारी, दस्त नोंदणी करणारे सहदुय्यम निबंधक दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जिल्हाप्रमुख म्हात्रे यांनी केली आहे.

या प्रकरणातील पालिका, बँक, दस्त नोंदणी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेणार आहोत. पंतप्रधान आवास योजनेत नोंदणी करणाऱ्या ५० टक्के परिवारांना या बेकायदा इमारतीत घरे मिळाली आहेत. याप्रकरणाचीही चौकशी होणे आवश्यक आहे, असे म्हात्रे यांनी सांगितले.

बेकायदा इमारती उभारणाऱ्या बहुतांशी इमारतींमध्ये मूळ विकासक कागदोपत्री कुठेही नाहीत. या विकासकांचे चालक, मुकादम, प्लम्बर, घरगडी यांच्या नावे व्यवहार करून विकासकांनी पैसा कमावून स्वता नामनिराळे राहण्याचा प्रयत्न केला आहे. अशा व्यवहारांचा शोध घेण्याची मागणी होत आहे.

"बेकायदा इमारती उभ्या राहत असताना ज्या पालिका अधिकाऱ्यांनी या इमारतींवर कारवाई करण्यात निष्काळजीपणा केला. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी."

**-दीपेश म्हात्रे जिल्हाप्रमुख, ठाकरेगट डोंबिवली.**

"डोंबिवलीतील ६५ महारेरा प्रकरणातील रहिवास असलेल्या ४७ इमारतींवर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कारवाई केली जाईल. आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग याप्रकरणाची चौकशी करत आहे. या इमारतींमधील रहिवाशांना न्यायालयाने नियमितीकरणासाठी अवधी दिला होता. काही रहिवासी सर्वोच्च न्यायालयात जाऊ इच्छितात, पण काही आदेश नसल्याने तोडकामाची कारवाई सुरू केली जाईल."

**-डॉ. इंदुराणी जाखड आयुक्त..**

## सायबर गुन्हेगारांनी वर्षभरात ठाणेकरांचे १६२ कोटी रुपये लुटले




| प्रकरणे | गुन्हे दाखल |
|---|---|
| शेअर बाजारच्या नावाखाली फसवणूक | ११६ |
| टास्क देऊन फसवणूक | ५८ |
| डिजीटल अटक फसवणूक | ५० |
| कुरिअर अडकल्याचे सांगत फसवणूक | २६ |
| इतर सायबर गुन्हे | ४६९ |
| एकूण | ७१९ |

**ठाणे :** गेल्या काही वर्षांमध्ये देशभरात सायबर फसवणूकीच्या प्रकरणांत सातत्याने वाढ होत आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात ऑनलाईन फसवणूक करून सायबर गुन्हेगारांनी ठाणेकरांचे २०२४ या वर्षभरात १६२ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे ठाणे पोलिसांच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. सर्वाधिक फसवणूक ही शेअर बाजाराच्या नावाने झाली आहे. या वर्षीही अशाप्रकारे अनेकांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे फसणूकीचे हे जाळे अद्यापही सुरूच असल्याचे स्पष्ट झाले आहे.

कोरोनानंतर अनेकजण शेअर बाजार, ऑनलाईन घरबसल्या कामे करू लागले आहेत. परंतु याचाच गैरफायदा घेत सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या मोठ्याप्रमाणात सक्रीय झाल्या. अवघ्या काही रुपयांच्या मोबदल्यात नागरिक सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकत असल्याचे ठाणे पोलिसांच्या आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात म्हणजेच, ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि भिवंडी या शहरात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत ७१९ ऑनलाईन फसवणूकीचे गुन्हे दाखल झाले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये सायबर गुन्हेगारांनी ठाणेकरांची १६२ कोटी रुपयांना फसवणूक केली आहे. यातील फक्त ३९ प्रकरणांचा छडा लावणे पोलिसांना शक्य झाले आहे.

या प्रकरणांमध्ये सर्वाधिक फसवणूक ही शेअर बाजाराच्या नावाखाली होत आहे. नागरिकांना समाजमाध्यमांवर संपर्क साधून त्यांच्या मोबाईलमध्ये शेअर बाजारासंदर्भातील एक बनावट ॲप सामाविष्ट करून त्यामध्ये नागरिकांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले जाते. त्यानंतर त्या ॲपमध्ये गुंतवणूकीच्या मोबदल्यात चांगला परतावा दाखविला जातो. ज्यावेळी गुंतवणूकदार □पच्या माध्यमातून पैसे काढण्याचा प्रयत्न करतो. ते पैसे त्याला मिळत नाही. अशाचपद्धतीने घरबसल्या कामांच्या (टास्क) नावाखाली देखील फसवणूक केली जात आहे. घरामध्ये बसून ऑनलाईनरित्या एखाद्या हॉटेल किंवा व्यवसायाविषयी प्रतिक्रिया नोंदविण्याच्या बदल्यात चांगले पैसे देत असल्याचे सांगत नागरिकांकडून पैसे उकळणाऱ्या टोळ्या कार्यरत आहेत.

याचप्रमाणे मागील काही महिन्यांत डिजीटल अटक प्रकरण देखील वाढत आहेत. एखाद्या व्यक्तीला पोलिसांच्या वेशात 'व्हिडीओ कॉल'द्वारे संपर्क साधून त्याला अटकेची धमकी देत पैसे उकळले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच एखादे कुरिअर विदेशात सीमा शुल्क विभागात अडकल्याचे सांगून त्यानंतर नागरिकांना अटकेची धमकी देत त्यांच्याकडून फसवणूक करण्याची प्रकरणे समोर आली आहेत. पोलीस तसेच सरकारकडून समाजमाध्यमांद्वारे जनजागृती केली जाते. परंतु पैशांच्या मोहामध्ये नागरिक स्वतःहून या जाळ्यांत अडकत असल्याचे प्रकरणांतून स्पष्ट होत आहे.

या संदर्भात सायबर गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपायुक्त पराग मणेरे यांच्याशी संपर्क साधला असता, संपर्क होऊ शकला नाही.

## जव्हार नगर परिषदेच्या दिमतीला फायर फायटर दुचाकी

**जव्हार :** जव्हार शहरात लोकवस्ती गेल्या पाच-सात वर्षांत अवाढव्य व नियमबाह्य वाढ दर्शवत आहे, त्यात अतिक्रमण देखील डोकेदुखीचा विषय आहे, लोकसंख्या वाढीने शहरात वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्या तुलनेत रस्त्यांची दुर्दशा रोडसाईड पार्किंग कळीचा मुद्दा आहे. परिणामी वाहनांची रस्त्यावरच दाटी होत आहे. अश्यातच एखाद्यावेळी आग लागल्यास घटनास्थळी अग्निशमन बंब पोचणे जिकिरीचे बनते. ही अडथळ्यांची शर्यत पार केल्यानंतर कसेबसे बंब पोहोचले तर तोपर्यंत आगीने नुकसान झालेले असते. त्यासाठी जव्हार नगर परिषदेला फायर फायटर दुचाकीची गरज होती. त्यानुसार पालिकेच्या ताफ्यात सध्या महाराष्ट्र अग्निशमन विभागातर्फे एक दुचाकी फायर फायटर दाखल झाली आहे. त्यामुळे आता छोटीशीही आग लागल्यावर दुचाकीवरून तेथे पोचून त्यावर नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे.

## गोदामाला भीषण आग... अग्निशमविण्यासाठी लागणार आणखी दोन दिवस


**ठाणे :** मुंबई नाशिक महामार्गालगच्या येवई भागात एका गोदामाला भीषण आग लागल्याची घटना बुधवारी पहाटे उघडकीस आली. या आगीत गोदामातील सर्व साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेत कोणीही जखमी झाले नसले तरी संपूर्ण आग शमविण्यासाठी आणखी दोन दिवस लागणार असल्याचे भिवंडी महापालिकेच्या अग्नीशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. भिवंडीत मंगळवारी सायंकाळी अशाचप्रकारे एका शिववणी वगार्ला आग लागली होती. त्यामुळे शहरात अग्नीसत्र सुरूच असल्याचे दिसून येत आहे.

भिवंडी येथील येवई गाव परिसरात आर. के. लॉजिस्टीक परिसरात तीन कंपन्यांचे एक गोदाम आहे. प्राथमिक माहितीनुसार, या गोदामांमध्ये सौंदर्य प्रसाधनांचा साठा असतो. बुधवारी पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास या गोदामाला अचानक भीषण आग लागली. अवघ्या काही क्षणात आगीने रौद्ररुप धारण केले. धुराचे लोट हवेत पसरले होते. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले. घटनेची माहिती भिवंडी महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर भिवंडी अग्निशमन दलाचे पथके घटनास्थळी दाखल झाले. ही आग इतकी भीषण होती की, आगीवर नियंत्रण मिळविणे पथकाला शक्य होत नव्हते. या अगीमध्ये कंपनीतील लाखो रुपयांचा साठा आगीत भस्मसात झाला. पथकाला सात तासानंतर येथील आगीवर नियंत्रण मिळविणे शक्य झाले. परंतु आग बुधवारी सायंकाळनंतरही धुमसत होती. त्यामुळे ही आग पूर्णपणे विजविण्यासाठी आणखी दोन दिवस लागू शकतात अशी माहिती भिवंडी महापालिकेच्या अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी राजेश पवार यांनी दिली.

दरम्यान, मंगळवारी देखील भिवंडी येथील ठाणगे आळी परिसरातील एका शिववणी वगार्ला आग लागली होती. ठाणगे आळी येथील ठक्कर कॉम्प्लेक्समध्ये विनटॉप क्लासेस नावाने शिकवणी आहे. परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थी शिकवणीच्या दुसऱ्या मजल्यावरील वर्गात अभ्यास करत होते. मंगळवारी सायंकाळी अचानक येथील वातानुकूलीत यंत्रणेमधून धूर येऊ लागला. त्यामुळे खबरदारी घेत शिकवणीतील ४० विद्यार्थ्यांना तळमजल्यावर आणण्यात आले. या आगीची झळ हळूहळू शिकवणीच्या तिसऱ्या मजल्यापर्यंत पसरली.

दरम्यान अग्निशमन दलाची दोन वाहने घटनास्थळी आले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले. यावेळी टोरेंट पॉवर कंपनीच्या पथकाने घटनास्थळी येऊन आजूबाजूचा वीजप्रवाह खंडित केला. त्यामुळे आगीवर नियंत्रण मिळविण्यास व्यत्यय आला नाही. परंतु या आगीमध्ये विनटॉप क्लासेस या शिकवणीच्या मालमत्तेचे नुकसान झाले.या घटनांमुळे भिवंडी शहरात आगीचे सत्र सुरूच असल्याचे चित्र आहे.

## उल्हास नदीवर धरणांची उभारणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे संकेत, पूरसंकट टळणार



**यांच्यामुळेच विरोधकांचा सुफडा साफ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना लाडक्या बहिणींचे आभार मानले. बहिणींचे असे प्रेम मिळाले की सगळ्यांचा सुफडा साफ झाला. ज्यांच्यामागे आई, बहिण आणि मुलीची ताकद त्यांचे कुणीही वाकडे करू शकत नाही, असेही फडणवीस म्हणाले.

**कथोरे मंत्र्यांपेक्षा मोठे :** किसन कथोरे यांना पाचव्यांदा आमदार झाल्यानंतरही मंत्रीपद मिळाले नसल्याची खंत एका भाजप पदाधिकाऱ्याने या कार्यक्रमात व्यक्त केली. त्यावर बोलताना कथोरे मंत्र्यांपेक्षा कमी आहेत काय, जे मंत्री करू शकत नाही ते कथोरे करू शकतात. पण ते योग्यवेळी नक्कीच मंत्री होतील. आता प्रत्यक्ष मुख्यमंत्री त्यांच्या पाठीशी उभा आहे, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

**बदलापूर :** उल्हास नदीवर वरच्या भागात धरणांची उभारणी केली जाणार आहे. त्यामुळे बदलापुरच्या पुराचा प्रश्न कमी होईल. त्याचसोबत नदी खोलीकरण आणि गाळ काढण्याच्या कामासाठी आवश्यक त्या गोष्टी केल्या जातील, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. बदलापुरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यासाठी फडणवीस आले होते. त्यावेळी शहरातील रखडलेली पाणी योजना, मेट्रो १४, उड्डाणपूल अशा सर्व विषयांवर तात्काळ दिलासा देण्याचेही आश्वासन बोलताना दिले.

बदलापूर शहराच्या पश्चिमेला उल्हास नदी किनारी आमदार किसन कथोरे यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. यावेळी किसन कथोरे यांनी रस्ते, मेट्रो १४, महामार्गांचे सेवा रस्ते, रखडलेली पाणी योजना, सॅटीस प्रकल्प, उड्डाणपुलांचे रखडलेले काम अशा विविध प्रश्नांची यादीच फडणवीस यांच्यासमोर वाचून दाखवली. त्याचवेळी बदलापूर शहराला शिवकालीन शहराचा दर्जा देण्याचीही मागणी त्यांनी केली.

पूररेषेच्या मुद्द्यावर दिलासा देण्याची महत्वाची मागणी कथोरे यांनी केली. त्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच उल्हास नदीवर धरणांची उभारणी केली जाणार आहे. त्यामुळे भविष्यात पुराचा धोका कमी होईल. तसेच नदीच्या खोलीकरण आणि गोळ काढण्याच्या कामासाठी आवश्यक ती पाऊले उचलली जातील, असेही फडणवीस यावेळी म्हणाले. मात्र उल्हास नदीचे प्रदुषण रोखण्याची गरज असून नदीत मिसळणारे नाले आणि प्रवाह रोखून त्या पाण्यावर प्रक्रिया करा. नदी निर्मल करा, असे आवाहन फडणवीस यांनी यावेळी केली. तर अन्य प्रकल्पांवरही तातडीने पाऊले उचलण्याचे आश्वासन फडणवीस यांनी यावेळी बोलताना दिले. बदलापुरसारख्या ऐतिहासिक शहरात महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांनी आभार मानले. यावेळी लाडक्या बहिणींच्या हस्ते फडणवीसांचा विशेष सत्कार करण्यात आला.

## पोलिसांवरच जमावाची दगडफेक करत हल्ला... चारजण अटकेत

**ठाणे :** भिवंडी येथे पोक्सो प्रकरणातील आरोपींना पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर जमावाने दगडफेक करून हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या हल्ल्यात पोलीस वाहनाच्या काचा फोडून वाहनाचे देखील नुकसान करण्यात आले आहे. याप्रकरणी ४० ते ५० जणांविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे.

भिवंडी येथील नारपोली पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात पिडीतेच्या आईचा जबाब नोंदविण्यासाठी पोलिसांचे पथक रुग्णालयात गेले होते. त्यावेळी रुग्णालयाबाहेर जमाव जमला होता. त्यामुळे जबाब घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनी पोलीस पथकाला बोलावले. त्यानुसार, पोलीस उपनिरीक्षक आकाश पवार, पोलीस हवालदार शिंदे आणि पोलीस नाईक तडवी हे यांचे पथक रुग्णालयात गेले. परंतु त्यापूर्वी तो जमाव तेथून निघून गेला होता. त्यामुळे पोलिसांचे पथक या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी निघाले होते. काही वेळानंतर वऱ्हाळदेवी मंदिर परिसरात २० ते २५ तरुण उभे असल्याचे पोलीस पथकाला आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्या जमावाला याबाबत विचारले असता, त्यांनी पोलिसांसोबत अरेरावी सुरू करत धक्काबुक्की करण्यास सुरूवात केली. त्यानंतर या ठिकाणी आणखी जमाव गोळा झाला. जमावाने पोलिसांना 'आता परत कसे जाता पाहतो' असे बालून धमकाविण्यास सुरूवात केली. त्यावेळी एका तरुणाने पोलीस नाईक तडवी यांच्या चेहऱ्यावर दगड फेकून मारला. त्यानंतर इतर जमावाने पवार,शिंदे आणि तडवी यांना धक्काबुक्की आणि त्यांच्या दिशेने दगडफेक करण्यास सुरूवात केली. पोलीस पथकाने घटनेची माहिती नारपोली पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर जमावाने पोलिसांचे शासकीय वाहनावर देखील दगड फेक करून वाहनाच्या काचा फोडल्या. याप्रकरणी सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४ - ३ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११०, १२१ (१), १२१(२), १३२, १८९ (२), १८९ (४), १९१ (२), ३२४ (६) अन्वये गुन्हा दाखल झाला असून जमावातील चार जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

## २.५ वर्षांच्या मुलाचा स्वच्छतागृहाच्या उघड्या टाकीत आढळला मृतदेह



**ठाणे :** भिवंडी येथील भादवड भागात अडीच वर्षांच्या मुलाचा मृतदेह स्वच्छतागृहाच्या उघड्या टाकीत आढळला. आयांश जैस्वाल असे मृत मुलाचे नाव असून मागील चार दिवसांपासून तो बेपत्ता होता. या प्रकरणी आता अकस्मात मृत्यूची नोंद शांतीनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आयांश जैस्वाल हा त्याचे आई-वडील, आजी आणि बहिणीसोबत भादवड गावात वास्तव्यास होता. भिवंडीतील सोनाळे परिसरात त्याचे आई-वडिल गोदामात कामाला जातात.

१४ फेब्रुवारीला त्याचे आई-वडील कामाला गेल्यानंतर तो सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास घराबाहेर खेळण्यासाठी गेला होता. उशीरापर्यंत तो घरी आला नसल्याने परिसरात त्याच्या आजीने शोध घेतला. परंतु तो कुठेही आढळून आला नाही. याप्रकरणी त्याच्या कुटुंबाने शांतीनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानुसार, मुलगा बेपत्ता असल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शांतीनगर पोलिसांनी मुलाचा शोध घेण्यास सुरूवात केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. त्यावेळी एक महिला संशयास्पदरित्या एका मुलाला तिच्यासोबत घेऊन जात असल्याचे आढळले.

पोलिसांनी तिचा शोध घेतला. परंतु तो मुलगा आयांश नव्हता. त्यानंतर पोलिसांनी घराच्या परिसरात मुलाचा शोध घेण्यास सुरूवात केली. मंगळवारी सकाळी पोलिसांनी येथील परिसरातील चाळीच्या स्वच्छतागृहाच्या टाकीमध्ये मुलाचा मृतदेह आढळला. ही टाकी उघडी असल्याने तो या टाकीमध्ये पडला असावा असा अंदाज पोलिसांना आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

## नायगाव येथे महिलेवर सामूहिक बलात्कार

**वसई :** नोकरीसाठी पुण्यात आलेल्या महिलेवर चार जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना घडली आहे. याशिवाय महिलेची अश्लील छायाचित्रे तयार करून बनावट खात्यासह इन्स्टाग्रामवर पोस्ट करण्यात आली आहेत. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणातील २ आरोपींना अटक करण्यात आली असून दोघांचा शोध सुरू आहे. २८ वर्षीय पीडित महिलेने दिलेल्या फियार्दीनुसार, २७ नोव्हेंबर रोजी ती पुण्यात नोकरीसाठी मुलाखत देण्यासाठी आली होती. मात्र उशीर झाल्याने मुलाखतीची वेळ चुकली. यावेळी तिच्या पतीच्या परिचयाचा मित्र पवन याला संपर्क केला. तो तिला घेण्यासाठी पुण्याला आला आणि नोकरी देण्याचे आश्वासन दिले. यानंतर तो तिला नायगावच्या चंडिका माता मंदिर परिसरातील घरी घेऊन आला. तेथे त्याचे अन्य साथीदार धनराज चव्हाण, नागेश गायकवाड, अभिषेक पुजारी या चौघांनी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला.

४ डिसेंबर ते ६ फेब्रुवारी या कालावधीत हा प्रकार घडला.यातील आरोपी पवन सब्बाद याने पीडित महिलेची अश्लिल छायाचित्रे काढून एका बनावट इन्स्टाग्राम खात्यावरून प्रसारीत करून तिची बदनामी केली. याशिवाय आरोपींनी तिचा मोबाईल, कानातील कर्णफुले असा ७५ हजारांचा ऐवज देखील बळजबरीने काढून घेतला. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहे. पीडित महिलेने याप्रकरणाची फिर्याद अकोला जिल्ह्यातील डबकी रोड पोलीस ठाण्यात दिली होती. मात्र घटना नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने गुन्हा नायगाव येथे वर्ग करण्यात आला आहे.



## शीव परिसरात लहान मुलींवर अत्याचार

**मुंबई :** शीव परिसरात सहा व आठ वर्षांच्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी २५ वर्षीय तरूणाविरोधात बलात्कार व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलींची शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. शीव परिसरात सोमवारी सायंकाळी ५ च्या सुमारास पीडित मुली खेळत होत्या. त्यावेळी आरोपी त्यांना एका वाहनामागे घेऊन गेला. त्यानंतर पीडित मुलींवर लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे पीडित मुली घाबरल्या. त्यापैकी एका मुलीने हा प्रकार कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर याप्रकरणी धारावी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ६४, ६५ (२) व पोक्सो कायद्यातील कलम ४, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपी शीव परिसरातील एका कारखान्यात कामाला आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## शेअर बाजाराच्या नावाखाली पाच जणांची ६० लाखांना फसवणूक




**ठाणे :** शेअर बाजारात जादा परतावा मिळवून देतो अशी बतावणी करून पाच जणांची ६० लाख रुपयांना फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

यातील मुख्य तक्रारदार हा कोलशेत भागात राहतो. नोव्हेंबर २०२४ मध्ये त्याला व्हॉट्सॲप क्रमांकावर एक संदेश प्राप्त झाला होता. त्या संदेशामध्ये एक ॲपचे लिंक देण्यात आले होते. त्यांनी लिंकवर क्लिक करून ते ॲप त्यांच्या मोबाईलमध्ये सामाविष्ठ केले. काही दिवसांनी त्यांना एका व्यक्तीने व्हॉट्सॲपवर संदेश पाठवून शेअर बाजारात गुंतवणूक करण्याबाबत माहिती दिली. चांगला परतावा मिळत असल्याने त्यांनी या ॲपच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यास सुरूवात केली. त्यांच्यासोबत त्यांच्या मित्राने देखील यात पैसे गुंतविले.

अशाप्रकारे दोघांनी मिळून २१ लाख २० हजार रुपये वेगवेगळ्या बँक खात्यात पाठविले. परंतु परतावा काढताना त्यांना ते ॲप बंद असल्याचे समोर आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी याप्रकरणी सरकारच्या एनसीसीआरपी संकेतस्थळावर ऑनलाईन तक्रार दाखल केली. त्यानंतर त्यांना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. फसवणूक झालेले व्यक्ती, त्यांचा मित्र आणि आणखी तीन जणांची अशाचप्रकारे ऑनलाईन फसवणूक झाली असल्याचे समोर आले. त्यानुसार, वेगवेगळ्या प्रकरणात एकत्रितरित्या कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com